मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

पंचम मंडलम्

प्रथम खंड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १५

पंचम मंडलम्

प्रथम खंड

सूक्त १ ते २२

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – श्री. श्रीपाद काळे

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १५

पंचम मंडलम् (प्रथम खंड)

सूक्त १ ते २२

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ७ जुलै २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व "शांखायन" अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला "शाकल संहिता" असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी

भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

पंचम मंडलाविषयी

ऋग्वेदाचे पाचवे मंडळ प्रामुख्याने 'अत्री मंडळ' म्हणून ओळखले जाते.

या मंडळाची मराठीत थोडक्यात आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण सूक्ते: या मंडळात ८७ सूक्ते (स्तोत्रे) समाविष्ट आहेत. त्यामुळे याचे आपण चार भाग करणार आहोत प्रत्येक भागात २२ सूक्त असतील पाचव्या महिन्यातला पहिला भाग पाठवत आहे

या मंडळातील बहुतांश सूक्तांची रचना महर्षी अत्री आणि त्यांच्या वंशजांनी (उदा. श्यावाश्व, गविष्ठिर, भौम अत्री) केली आहे. त्यामुळे याला 'अत्री मंडळ' म्हणतात

सूर्यग्रहण कथा (सूक्त ५.४०): या मंडळातील ४० व्या सूक्तामध्ये एका ऐतिहासिक खगोलीय घटनेचा उल्लेख येतो. जेव्हा राहु आणि असुर स्वरभानूने सूर्याला आपल्या अंधाराने झाकले (सूर्यग्रहण झाले), तेव्हा महर्षी अत्री यांनी आपल्या मंत्रशक्तीने आणि प्रार्थनेने सूर्याला पुन्हा प्रकाशमान केले, अशी कथा यात आढळते.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. : २५४१४५४/२५४०३६२. विश्वावसु वर्षे १९८५

E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

आषाढ शुद्ध १४ सोमवार

दि. ७/७/२०२५

श्री. ज. विंझे हेमंत लक्ष्मण

मुंबई.

मो. 7678094624

वीरस्थ देवतेचे उत्तम आइतिथि व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात ते ही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय सुरुवातही आहे.

खरे तर आपण ॲनोपॅरेलिक सर्जन. अनेकांची ऑपरेशन करून आपण त्या लोकांना आरोग्य प्राप्ती करून दिली. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृद्धांचे आशीर्वाद ही घेतले. परिणाम असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतर ही आपण आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध सत्कर्मी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लावला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व संस्कृत भाषेतील आशीर्वाद सुख आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुद्धा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुलकर्णी यांनी यजुर्वेदी केला. व ऋग्वेद, साम वेदांचे भाषांतर करून ते अलभ्य झाले होते. जवळ बसून (जय १८ वर्षे) ते अथर्ववेदाचे भाषांतर करत होते. असो. कदाचित ही कोणी गरजेपेक्षा उरलेले पण आम्हाला माहीत कधी नव्हते.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच वीरस्थ देवतेचा चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा वीरस्थ देवतेचे अनेक आइतिथि व आमचे नारायण स्मरण सर्वांस विदित करावे.

महानुग्रहांकित वरीवर्ति

श्री. जगद्गुरु शंकराचार्य.

करवीर पीठ.

कोल्हापूर.

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१

ऋषि- बुध आणि गविष्ठिर आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** – त्रिष्टुप् ११ जगती

अबोध्यग्निः समिधा जनानां प्रति धेनुमिवायतीमुषासम् ।
यह्वा इव प्र वयामुज्जिहानाः प्र भानवः सिस्रते नाकमच्छ ॥१॥
आपल्या वासराकडे धाव घेणाऱ्या गायींप्रमाणे समोर येणाऱ्या उषादेवतेला भेटण्यासाठी उत्सुक झालेले अग्निदेव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञातील समिधांमुळे जागृत झाले आहेत. अग्निदेवांच्या प्रचंड ज्वाळा विस्तीर्ण फांद्या असलेल्या वृक्षाप्रमाणे आकाशाकडे वेगाने झेपावत आहेत ॥१॥

अबोधि होता यजथाय देवानूर्ध्वो अग्निः सुमनाः प्रातरस्थात् ।
समिद्धस्य रुशददर्शि पाजो महान्देवस्तमसो निरमोचि ॥२ ॥
दिव्य यज्ञासाठी यज्ञकर्ते अग्निदेव प्रसन्न मनाने पहाटेच्या वेळी प्रदीप्त होऊन वर झेपावत आहेत. संपूर्णपणे प्रदीप्त (समिद्धस्य) झाल्याने अग्निदेवांचे दिव्य आणि शुभ्र तेज दृश्यमान आहे. अशा प्रकारे महानअग्निदेव अंधाराच्या पाशातून पूर्णपणे मुक्त झाले आहेत. ॥२ ॥

यदीं गणस्य रशनामजीगः शुचिरङ्क्ते शुचिभिर्गोभिरग्निः ।
आद्दक्षिणा युज्यते वाजयन्त्युत्तानामूर्ध्वो अधयज्जुहूभिः ॥३ ॥

जेव्हा अग्निदेव सृष्टीला बांधून ठेवणाऱ्या अंधकाराच्या बंधनांना (दोरीला) आपल्यामध्ये सामावून घेतात, तेव्हा ते स्वतः अतिशय पवित्र होऊन आपल्या दिव्य किरणांनी संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतात. त्यानंतर, प्रदीप्त होऊन ऊर्ध्वगामी अग्निदेव, अन्नाची इच्छा करणाऱ्या घृतयुक्त धारांना आपल्या ज्वाळांनी प्राशन करतात. ॥३ ॥

अग्निमच्छा देवयतां मनांसि चक्षूंषीव सूर्ये सं चरन्ति ।
यदीं सुवाते उषसा विरूपे श्वेतो वाजी जायते अग्रे अह्नाम् ॥४ ॥
ज्याप्रमाणे सर्व माणसांचे डोळे सूर्यदेवांकडे वळतात, त्याचप्रमाणे देवांची इच्छा करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांची मने अग्निदेवांकडे एकाग्र होतात. जेव्हा भिन्न रूपांच्या दोन उषादेवता अग्निदेवांना प्रकट करतात, तेव्हा दिवसाच्या प्रारंभी अग्निदेव शुभ्र आणि शक्तिशाली अश्वाप्रमाणे तेजस्वीपणे प्रकट होतात. ॥४ ॥

जनिष्ट हि जेन्यो अग्रे अह्नां हितो हितेष्वरुषो वनेषु ।
दमेदमे सप्त रत्ना दधानोऽग्निर्होता नि षसादा यजीयान् ॥५॥
दिवसांच्या आरंभी विजयी आणि तेजस्वी अग्निदेव जन्माला येऊन अरण्यामधील काष्ठांमध्ये सुप्त रूपाने निवास करतात. घराघरात सात प्रकारची रत्ने धारण करणारे श्रेष्ठ यज्ञकर्ते अग्निदेव यज्ञस्थळी निवास करून पूजनीय बनतात. ॥५ ॥
(काही अभ्यासकांच्या मते, ही सात रत्ने मानवी शरीरातील सात चक्रे)

अग्निर्होता न्यसीदद्यजीयानुपस्थे मातुः सुरभा उ लोके ।

युवा कविः पुरुनिष्ठ ऋतावा धर्ता कृष्टीनामुत मध्य इद्धः ॥६॥

सर्वश्रेष्ठ यज्ञकर्ते अग्निदेव मातेच्या (पृथ्वीच्या) सुगंधी आणि मंगलमय मांडीवर विराजमान झाले आहेत. नित्य तरुण, भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञानी, सत्याचे रक्षक आणि सर्व मानवांचा आधार देणारे अग्निदेव यज्ञवेदीच्या मध्यभागी प्रदीप्त झाले आहेत. ॥६ ॥

प्र णु त्यं विप्रमध्वरेषु साधुमग्निं होतारमीळते नमोभिः ।

आ यस्ततान रोदसी ऋतेन नित्यं मृजन्ति वाजिनं घृतेन ॥७॥

यज्ञकार्य सिद्ध करणाऱ्या, प्रसिद्ध, ज्ञानी अग्निदेवांची भक्तगण नतमस्तक होऊन स्तुतियुक्त स्तोत्रांच्या सहाय्याने स्तुती करतात.
सत्याचे रक्षक अग्निदेवांनी आकाश आणि पृथ्वीला व्यापले आहे. त्या बलवान अश्वांप्रमाणे अग्निदेवांना यज्ञकर्ते भक्तगण नित्यनेमाने घृताच्या आहुती देऊन शुद्ध करतात. ॥७॥

मार्जाल्यो मृज्यते स्वे दमूनाः कविप्रशस्तो अतिथिः शिवो नः ।

सहस्रशृङ्गो वृषभस्तदोजा विश्वाँ अग्ने सहसा प्रास्यन्यान् ॥८॥

यज्ञशाळेत शुद्ध केला जाणाऱ्या, विद्वानांनी स्तुती केलेल्या आणि घराचे रक्षण करणाऱ्या हे अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी कल्याणकारी अतिथींप्रमाणे आपण आहात. हजारो ज्वाळांची शिंगे धारण करणारे,

वृषभाप्रमाणे (बैल) सामर्थ्यवान आणि ओजस्वी असे अग्निदेव आपल्या बलाने इतर सर्व शत्रूंना पराभूत करतात. ॥८ ॥

प्र सद्यो अग्ने अत्येष्यन्यानाविर्यस्मै चारुतमो बभूथ ।
ईळेन्यो वपुष्यो विभावा प्रियो विशामतिथिर्मानुषीणाम् ॥९॥

हे अग्निदेवा !आपण सर्व शक्तींना मागे टाकत त्वरेने पुढे जाता. आपण जन्माला आला तेव्हापासून आपण मनोहर, प्रिय, वंदनीय, दिव्य स्वरूपी, सर्वत्र प्रकाश पसरवणारे मनुष्यांचे लाडके अतिथी आहात. ॥९ ॥

तुभ्यं भरन्ति क्षितयो यविष्ठ बलिमग्ने अन्तित ओत दूरात् ।
आ भन्दिष्ठस्य सुमतिं चिकिद्धि बृहत्ते अग्ने महि शर्म भद्रम् ॥१० ॥

हे अत्यंत तरुण अशा अग्निदेवा! जवळचे आणि दूरचे असे सर्व यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासाठी हविष्यान्नाच्या आहुती घेऊन येतात. आपल्या स्तुती करणाऱ्या भक्तगणांच्या सद्भावना (सुमति) स्वीकाराव्यात ही विनंती. अग्निदेवा! आपले संरक्षण अत्यंत विशाल, महान आणि कल्याणकारी आहे.॥१०॥

आद्य रथं भानुमो भानुमन्तमग्ने तिष्ठ यजतेभिः समन्तम् ।
विद्वान्पथीनामुर्वन्तरिक्षमेह देवान्हविरद्याय वक्षि ॥११॥

हे तेजस्वी आणि अविनाशी अग्निदेवा! आपण आपल्या प्रकाशमान आणि शीघ्रगामी रथावर देवतांसह आरूढ व्हावे ही विनंती. आपण सर्व मार्गांचे ज्ञाता आहात , म्हणून आकाशातील त्या सुलभ आणि सरळ मार्गांनी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ही हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचवावी ही विनंती. ॥११॥

अवोचाम कवये मेध्याय वचो वन्दारु वृषभाय वृष्णे।

गविष्ठिरो नमसा स्तोममग्नौ दिवीव रुक्ममुरुव्यञ्चमश्रेत् ॥१२॥

आम्ही भक्तगण बुद्धिमान, पवित्र भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या अग्निदेवांना वंदनीय स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करत आहोत. महर्षी गविष्ठिर ऋषींनी अतिशय नम्रतेने अग्निदेवांना अर्पण केलेले हे स्तोत्र आकाशामध्ये सूर्यदेवांच्या विस्तीर्ण तेजाप्रमाणे सर्वत्र पसरले आहे. ॥१२॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२

ऋषि- कुमार आत्रेय अथवा वृश जान किंवा दोघेही २.९ वृश जान **देवता** – अग्नि

छन्द – त्रिष्टुप् १२ शक्वरी

कुमारं माता युवतिः समुब्धं गुहा बिभर्ति न ददाति पित्रे ।

अनीकमस्य न मिनज्जनासः पुरः पश्यन्ति निहितमरतौ ॥१॥

तरुण माता (अरणी) त्या बालकाला (अग्निदेवांना) आपल्या गर्भात लपवून ठेवते आणि त्याला पित्याच्या (यज्ञकर्त्या भक्तगणांच्या) स्वाधीन करत नाही. अग्निदेव जेव्हा प्रकट होतात तेव्हा न क्षीण होणाऱ्या त्यांच्या तेजाला सर्वजण पाहतात. अग्निदेव मूळ रूपात अरणी मध्येच दडलेले असतात. ॥१ ॥

कमेतं त्वं युवते कुमारं पेषी बिभर्षि महिषी जजान ।

पूर्वीर्हि गर्भः शरदो ववर्धापश्यं जातं यदसूत माता ॥२ ॥

हे महान तरुणी, तू आपल्या गर्भात बालकाला (अग्निदेवांना) गुप्तपणे ठेवून , त्याला जन्म दिला आणि त्याचे उत्तम संगोपन केले. हा गर्भ अनेक वर्षांपासून वाढत होता. जेव्हा तू त्याला जन्म दिलास, तेव्हा सर्वांनी (भक्तगणांनी) त्याला पाहिले. ॥२ ॥

हिरण्यदन्तं शुचिवर्णमारात्क्षेत्रादपश्यमायुधा मिमानम् ।

ददानो अस्मा अमृतं विपृक्वत्किं मामनिन्द्राः कृणवन्ननुक्थाः ॥३ ॥

आम्ही भक्तगणांनी सोन्यासारखे तेजस्वी दात असलेल्या, तेजस्वी कांती असलेल्या, दुरूनच आपली शस्त्र चमकवत येत असलेल्या अग्निदेवांना पाहिले. आम्ही भक्तगण अग्निदेवांना अमृतासारखी स्तुती अर्पण करतो. जे देवांची स्तुती करत नाहीत, असे अश्रद्ध लोक आम्हा भक्तगणांचे काय वाकडे करू शकतील ?॥३ ॥

क्षेत्रादपश्यं सनुतश्चरन्तं सुमद्यूथं न पुरु शोभमानम् ।

न ता अगृभ्रन्नजनिष्ट हि षः पलिक्नीरिद्युवतयो भवन्ति ॥४ ॥

आनंदी कळप ज्याप्रमाणे संचार करत असतो, त्याप्रमाणे गुप्त अग्निदेवांना त्यांच्या निवासस्थानी संचार करताना आम्ही भक्तगणांनी पाहिले आहे. ज्यावेळेला अग्निदेव प्रकट होतात त्यावेळेला त्यांच्या तेजस्वी ज्वाळांना कोणीही स्पर्श करू शकत नाही. तरुण स्त्रिया वृद्ध होतात त्याप्रमाणे क्षीण होणाऱ्या अग्निदेवांच्या ज्वाळा हविष्यान्नाच्या आहुतीने परत एकदा वार्धक्यातून परत येऊन तरुण स्त्रियांइतक्याच प्रखर होतात. ॥४ ॥

के मे मर्यकं वि यवन्त गोभिर्न येषां गोपा अरणश्चिदास ।

य ईं जगृभुरव ते सृजन्त्वाजाति पश्च उप नश्चिकित्वान् ॥५ ॥

असे कोण आहेत जे अग्निदेवांच्या तेजस्वी रूपाला गायींपासून (ज्ञानापासून) दूर करत आहेत? ज्याचा कोणी रक्षकनाही अशा अग्निदेवांना अनोळखी लोकांनी पकडले आहे. त्यांनी अग्निदेवांना मुक्त करावे कारण तेच अग्निदेव खऱ्या अर्थाने पशूंना (ज्ञानाला) भक्तगणांकडे परत घेऊन येतील. ॥५ ॥

वसां राजानं वसतिं जनानामरातयो नि दधुर्मर्त्येषु ।

ब्रह्माण्यत्रेरव तं सृजन्तु निन्दितारो निन्द्यासो भवन्तु ॥६ ॥

भक्तगणांचे आश्रयस्थान, धनाचा वर्षाव करणाऱ्या अग्निदेवांना, जे यज्ञ करत नाहीत अशा शत्रूंनी मानवांमध्ये लपवून ठेवले आहे. अग्निदेवांना अत्रीऋषींच्या मंत्रांनी मुक्त करावे. अग्निदेवांची निंदा करणारेच स्वतः निंदनीय आहेत. ॥६ ॥

शुनश्चिच्छेपं निदितं सहस्राद्यूपादमुञ्चो अशमिष्ट हि षः ।

एवास्मदग्ने वि मुमुग्धि पाशान्होतश्चिकित्व इह तू निषद्य ॥७ ॥

हे अग्निदेवा ! आपण, हजारो साखळदंडांनी यूपस्तंभाला बांधलेल्या शुनःशेप नावाच्या ऋषीपुत्राला आपली स्तुती केल्यामुळे बंधन मुक्त केले. हे सर्वज्ञ अग्निदेवा ! आपण आमच्या यज्ञस्थळी विराजमान व्हावे आणि आम्हाला सर्व पापाच्या बंधनांपासून पूर्णपणे मुक्त करावे ही विनंती. ॥७ ॥

हृणीयमानो अप हि मदैयेः प्र मे देवानां व्रतपा उवाच ।

इन्द्रो विद्वाँ अनु हि त्वा चचक्ष तेनाहमग्ने अनुशिष्ट आगाम् ॥८ ॥

हे अग्निदेवा ! आम्ही भक्तगण लज्जित होऊन (हृणीयमान) आपल्यापासून दूर निघून गेलो होतो. परंतु व्रतांचे पालन करणाऱ्या इंद्रदेवांनी आम्हा भक्तगणांना उपदेश केला. त्या विद्वान इंद्रदेवांनी आम्हाला पाहिले होते, त्यांच्या उपदेशानुसार हे अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आपल्यासमोर उपस्थित झालो आहोत. ॥८ ॥

वि ज्योतिषा बृहता भात्यग्निराविर्विश्वानि कृणुते महित्वा ।

प्रादेवीर्मायाः सहते दुरेवाः शिशीते शृङ्गे रक्षसे विनिक्षे ॥९॥

अग्निदेव आपल्या विशाल प्रकाशाने सर्वत्र झळाळत, स्वतःच्या सामर्थ्याने संपूर्ण विश्वाला प्रकाशमान करत आहेत. अग्निदेव दुष्ट मार्गांनी चालणाऱ्यांच्या मायावी शक्तींना पराभूत करतात. दुष्ट राक्षसी शक्तींचा नायनाट करण्यासाठी ते आपल्या दोन शिंगांना (ज्वाळांना) तीक्ष्ण करत आहेत. ॥९॥

उत स्वानासो दिवि षन्त्वग्नेस्तिग्मायुधा रक्षसे हन्तवा उ ।

मदे चिदस्य प्र रुजन्ति भामा न वरन्ते परिबाधो अदेवीः ॥१० ॥

अग्निदेवांच्या तीक्ष्ण शस्त्रांसारखे आवाज करणाऱ्या ज्वाळा राक्षसांचा नायनाट करण्याकरता आकाशलोकात पोहचतात. अग्निदेवांच्या क्रोधयुक्त ज्वाळा हविष्यान्नाच्या प्रभावाने सर्व दुष्ट अडथळयांना मोडून काढतात. कोणतीही ही शक्ती अगदी अग्निदेवांच्या या प्रभावाला रोखू शकत नाही॥१०॥

एतं ते स्तोमं तुविजात विप्रो रथं न धीरः स्वपा अतक्षम् ।

यदीदग्ने प्रति त्वं देव हर्याः स्ववर्तीरप एना जयेम ॥११॥

हे अनेक रूपांत प्रकट होणाऱ्या अग्निदेवा ! ज्याप्रमाणे एखादा कुशल कारागीर रथाची निर्मिती करतो, त्याचप्रमाणे आम्ही भक्तगणांनी आपल्यासाठी या स्तोत्रांची निर्मिती केली आहे. हे अग्निदेवा ! आपण या सुख देणाऱ्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा आनंदाने स्वीकार करावा. आपल्या कृपेने आम्ही भक्तगण सर्व संकटांवर मात करून विजय प्राप्त करू शकू. ॥११॥

तुविग्रीवो वृषभो वावृधानोऽशत्रुर्वयः समजाति वेदः ।

इतीममग्निममृता अवोचन्बर्हिष्मते मनवे शर्म यंसद्धविष्मते मनवे शर्म यंसत् ॥१२॥

अनेक ज्वाळा असलेल्या, सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या, तेजाने वाढणाऱ्या, कोणताही शत्रू नसलेल्या अग्निदेवांना देवता म्हणाले, " हे अग्निदेवा ! यज्ञ करणाऱ्या (बर्हिष्मते) आणि हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना आपण सुख प्राप्त करून द्यावे ही विनंती. "॥१ २॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३

ऋषि- वसुश्रुत आत्रेय **देवता** – अग्नि ३मरुद्गण **छन्द** – त्रिष्टुप्

त्वमग्ने वरुणो जायसे यत्त्वं मित्रो भवसि यत्समिद्धः ।
त्वे विश्वे सहसस्पुत्र देवास्त्वमिन्द्रो दाशुषे मर्त्याय ॥१॥

हे अग्निदेवा ! जेव्हा आपण प्रकट होता तेव्हा आपण वरुणदेवांसारखे असता. आपण प्रदीप्त झाल्यावर आपण मित्रदेव होता. हे बलपुत्रा अग्निदेवा ! आपल्यामध्ये सर्व देव सामावले आहेत आणि हविष्यान्नाची आहुती देणारे भक्तगण आपली, इंद्रदेवांसारखी उपासना करतात. ॥१ ॥

त्वमर्यमा भवसि यत्कनीनां नाम स्वधावन्गुह्यं बिभर्षि ।
अञ्जन्ति मित्रं सुधितं न गोभिर्यद्दम्पती समनसा कृणोषि ॥२॥

हे स्वबळावर अधिकार असलेल्या (स्वधावान्) अग्निदेवा ! आपल्या गुप्त नावाने आपण कन्यांसाठी 'अर्यमा' होता. जेव्हा पती-पत्नी आपल्याला गायींच्या दुधा-तुपाने अभिषिक्त करतात तेव्हा त्या पति-पत्नींना आपण समान विचारांचे करता. ॥२ ॥

तव श्रिये मरुतो मर्जयन्त रुद्र यत्ते जनिम चारु चित्रम् ।
पदं यद्विष्णोरुपमं निधायि तेन पासि गुह्यं नाम गोनाम् ॥३॥

हे रुद्रदेवा (अग्निदेवा)! आपल्या वैभवासाठी मरुद्गण अंतराळ शुद्ध करतात. हे रुद्रदेवा ! आपला जन्म अत्यंत सुंदर आणि विस्मयकारक आहे. विष्णुदेवांनी आपली सर्वोच्च स्थानी स्थापना केली आहे. आपण विष्णुदेवांच्या सर्वोच्च पदाच्या सामर्थ्याने जीवनदायी तत्त्वांच्या (गोनाम्) रहस्याचे रक्षण करता. ॥३॥

तव श्रिया सुदृशो देव देवाः पुरू दधाना अमृतं सपन्त ।
होतारमग्निं मनुषो नि षेदुर्दशस्यन्त उशिजः शंसमायोः ॥४॥

हे अग्निदेवा ! आपल्या दिव्य तेजामुळे इतर देव दृश्यमान होऊन महान अमृततत्वाचे सेवन करतात. हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे भक्तगण आपल्याला यज्ञाचा प्रमुख यज्ञकर्ता मानून आपल्या सेवेत मग्न होतात. ॥४ ॥

न त्वद्धोता पूर्वो अग्ने यजीयान्न काव्यैः परो अस्ति स्वधावः ।
विशश्च यस्या अतिथिर्भवासि स यज्ञेन वनवद्देव मर्तान् ॥५॥

हे सामर्थ्यवान अग्निदेवा ! आपल्यापेक्षा श्रेष्ठ असा आहुती देणारा यज्ञकर्ता पूर्वी कधीही झाला नाही. आपल्या अलौकिक बुद्धी पलीकडे कोणीही श्रेष्ठ नाही. ज्या भक्तगणांचे आपण आतिथ्य स्वीकारता ते भक्तगण शत्रूंना सहजपणे जिंकतात. ॥५ ॥

वयमग्ने वनुयाम त्वोता वसूयवो हविषा बुध्यमानाः ।
वयं समर्ये विदथेष्वह्नां वयं राया सहसस्पुत्र मर्तान् ॥६॥

हे अग्निदेवा ! आपले संरक्षण लाभलेले आणि धनाची इच्छा धरणारे आम्ही भक्तगण हविष्यान्नाची आहुती अर्पण करून आपल्याला प्रदीप्त करतो. आपल्या सहाय्याने आम्ही शत्रूवर विजय मिळवू . हे बलपुत्र अग्निदेवा ! आपण प्रदान केलेल्या धनाच्या आणि ऐश्वर्याच्या बळावर आम्ही भक्तगण शत्रूंना पराभूत करू शकू. ॥६ ॥

यो न आगो अभ्येनो भरात्यधीदघमघशंसे दधात ।

जही चिकित्वो अभिशस्तिमेतामग्ने यो नो मर्चयति द्वयेन ॥७॥

हे ज्ञानस्वरूप अग्निदेवा ! जे कोणी आमच्यावर दोषारोप करतात किंवा आमच्यावर खोटे कलंक लादतात त्या आम्हा भक्तगणांचे वाईट चिंतणाऱ्यावरच ते उलटवावे . जे आम्हा भक्तगणांना कपटाने आणि दुष्टपणाने त्रास देतात त्या व्यक्तींकडून होणारी आमची निंदा आणि कलंक आपण पूर्णपणे नष्ट करावे ही विनंती. ॥७ ॥

त्वामस्या व्युषि देव पूर्वे दूतं कृण्वाना अयजन्त हव्यैः ।

संस्थे यदग्न ईयसे रयीणां देवो मर्तैर्वसुभिरिध्यमानः ॥८ ॥

हे ज्ञानस्वरूप अग्निदेवा ! रात्रीच्या शेवटी म्हणजे उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी प्राचीन काळातील ऋषींनी हविष्यान्नाची आहुती अर्पण करून उपासना केली. जेव्हा आपण भक्तगणांद्वारे प्रदीप्त होता तेव्हा सर्व देवतांचे समूहासह तेथे उपस्थित असतात. ॥८ ॥.

अव स्पृधि पितरं योधि विद्वान्पुत्रो यस्ते सहसः सून ऊहे ।

कदा चिकित्वो अभि चक्षसे नोऽग्ने कदाँ ऋतचिद्यातयासे ॥९ ॥

हे सर्वज्ञ अग्निदेवा ! जे भक्तगण आपली पित्याप्रमाणे रक्षण करण्यासाठी, बुद्धिपूर्वक प्रार्थना करतात, त्या आपल्या पुत्रासमान भक्तांना संकटमुक्त करावे ही विनंती. हे सामर्थ्याच्या पुत्रा अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे कृपा दृष्टीने केव्हा पहाल आणि आम्हाला सरळ मार्गाचे अनुसरण करण्यास केव्हा प्रेरणा द्याल? ॥९ ॥

भूरि नाम वन्दमानो दधाति पिता वसो यदि तज्जोषयासे ।

कुविद्देवस्य सहसा चकानः सुम्नमग्निर्वनते वावृधानः ॥१० ॥

हे निवासदात्या अग्निदेवा ! आपण एखाद्या पित्याप्रमाणे यज्ञकर्त्या भक्तगणांनी विपुल प्रमाणात, नम्रता पूर्वक केलेले वंदन प्रीती पूर्वक स्वीकारता. असे भक्तीने वाढणारे, आपल्या शक्तीची कामना करणारे, भक्तगण आपल्या कृपेने महान सुख प्राप्त करतात. ॥१ ० ॥

त्वमङ्ग जरितारं यविष्ठ विश्वान्यग्ने दुरिताति पर्षि ।

स्तेना अदृश्रन्रिपवो जनासोऽज्ञातकेता वृजिना अभूवन् ॥११॥

हे अत्यंत तरुण अग्निदेवा ! आपल्याला चोर आणि कुटिल हेतूचे शत्रू दिसू लागताच आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांना सर्व संकटातून पार करता. ॥११॥

इमे यामासस्त्वद्रिगभूवन्वसवे वा तदिदागो अवाचि ।

नाहायमग्निरभिशस्तये नो न रीषते वावृधानः परा दात् ॥१२॥

हे अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या उपासनेचे प्रयत्न आपल्यासाठी आहेत. धनाच्या प्राप्तीसाठी आमच्याकडून झालेले अपराध आपल्याला माहित आहेत. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतीने प्रफुल्लित झालेल्या हे अग्निदेवा ! आम्हाला निंदकाच्या किंवा हिंसकांच्या हवाली करू नये ही विनंती. ॥१२॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४

ऋषि- वसुश्रुत वसुश्रुत आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** – त्रिष्टुप्

त्वामग्ने वसुपतिं वसूनामभि प्र मन्दे अध्वरेषु राजन् ।
त्वया वाजं वाजयन्तो जयेमाभि ष्याम पृत्सुतीर्मर्त्यानाम् ॥१॥
हे अग्निदेवा! आपण ऐश्वर्याचे स्वामी आहात. हे राजन्! यज्ञाच्या समयी आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतो. विजयाची इच्छा बाळगणारे आम्ही भक्तगण आपल्या दिव्यशक्तीच्या सहाय्याने शत्रूंची आक्रमणे परतवून लावू ॥१॥

हव्यवाळग्निरजरः पिता नो विभुर्विभावा सुदृशीको अस्मे ।
सुगार्हपत्याः समिषो दिदीह्यस्मद्र्यक्सं मिमीहि श्रवांसि ॥२॥
हविष्यान्नाची आहुती वाहून नेणारे, कधीही वृद्ध न होणारे, वडिलांप्रमाणे आमचे रक्षण करणारे, सर्वव्यापी, प्रकाशमान, अत्यंत सुंदर हे अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना उत्तम गृहस्थाश्रम आणि अन्न-ऐश्वर्य देण्यासाठी प्रदीप्त व्हावे आणि आम्हाला उत्तम यश व कीर्ती प्रदान करावी ही विनंती॥२॥

विशां कविं विश्पतिं मानुषीणां शुचिं पावकं घृतपृष्ठमग्निम् ।
नि होतारं विश्वविदं दधिध्वे स देवेषु वनते वार्याणि ॥३॥

यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! प्रजेचे रक्षक, सर्वज्ञ, अत्यंत पवित्र, पावन करणाऱ्या, घृताच्या आहुती अर्पण केल्या जातात अशा अग्निदेवांना यज्ञवेदीमध्ये स्थापन करावे. सर्व ऐश्वर्याचे स्वामी अग्निदेव भक्तगणांना श्रेष्ठ आणि इच्छित रत्ने प्रदान करोत. ॥३ ॥

जुषस्वाग्न इळया सजोषा यतमानो रश्मिभिः सूर्यस्य ।

जुषस्व नः समिधं जातवेद आ च देवान्हविरद्याय वक्षि ॥४॥

हे सर्वज्ञ अग्निदेवा ! सूर्यदेवांच्या किरणांप्रमाणे एकाग्रतेने कार्य करून (यतमान) आणि तेजस्वी होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतिवचनांनी प्रसन्न होऊन आमचा स्वीकार करावा ही विनंती. आपण आमच्या या समिधांचा आनंदाने स्वीकार करावा आणि हविष्यान्नाची आहुती ग्रहण करण्यासाठी देवतांना आमच्या यज्ञामध्ये घेऊन यावे ही विनंती. ॥४ ॥

जुष्टो दमूना अतिथिर्दुरोण इमं नो यज्ञमुप याहि विद्वान् ।

विश्वा अग्ने अभियुजो विहत्या शत्रूयतामा भरा भोजनानि ॥५ ॥

हे सर्वज्ञ अग्निदेवा ! आपण आमच्या घरात सर्वांना प्रिय असलेले आणि घराचे रक्षण करणारे अतिथी आहात. आपण आमच्या यज्ञाचा स्वीकार करण्यासाठी यावे आणि आमच्यावर आक्रमण करणाऱ्या सर्व शत्रूंचा नाश करून, शत्रुत्व करणाऱ्यांची सर्व संपत्ती आणि ऐश्वर्य आम्हाला उपभोगण्यासाठी प्राप्त करून द्यावे ही विनंती. ॥५ ॥

वधेन दस्युं प्र हि चातयस्व वयः कृण्वानस्तन्वे स्वायै ।
पिपर्षि यत्सहसस्पुत्र देवान्त्सो अग्ने पाहि नृतम वाजे अस्मान् ॥६॥
हे शक्तीच्या पुत्रा अग्निदेवा ! आपण आपल्या देहासाठी अन्नग्रहण करत असताना आपल्या शस्त्राने आमच्या शत्रूंचा नाश करावा ही विनंती. आपण सर्व देवांचे पोषण करता. आपण आमचेही युद्धात आणि जीवनाच्या संघर्षात रक्षण करावे ही विनंती. ॥६ ॥

वयं ते अग्न उक्थैर्विधेम वयं हव्यैः पावक भद्रशोचे ।
अस्मे रयिं विश्ववारं समिन्वास्मे विश्वानि द्रविणानि धेहि ॥७॥
हे पवित्र करणाऱ्या, कल्याणकारी तेज असलेल्या अग्निदेवा ! आम्ही भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांनी आणि हविष्यान्नाच्या आहुतीने आपली पूजा करतो. आपण आम्हा सर्वांना अपेक्षित असलेले परम ऐश्वर्य प्रदान करावे आणि आम्हावर सर्व प्रकारच्या संपत्तीचा वर्षाव करावा ही विनंती. ॥७ ॥

अस्माकमग्ने अध्वरं जुषस्व सहसः सूनो त्रिषधस्थ हव्यम् ।
वयं देवेषु सुकृतः स्याम शर्मणा नस्त्रिवरूथेन पाहि ॥८॥
हे जल, भूमी आणि पर्वत या तिन्ही स्थानांवर (त्रिषधस्थ) निवास करणाऱ्या अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाचा आणि हविष्यान्नाच्या आहुतीचा प्रेमाने स्वीकार करावा ही विनंती. आम्ही देवतांच्या दृष्टीने नेहमी पुण्यकर्म करू. आपण आमच्या वाचिक, मानसिक आणि शारीरिक अशा तीन प्रकारच्या (त्रिवरूथेन) कष्टांपासून रक्षण करावे आणि आम्हाला परमसुख प्रदान करावे ही विनंती. ॥८ ॥

विश्वानि नो दुर्गहा जातवेदः सिन्धुं न नावा दुरिताति पर्षि ।
अग्ने अत्रिवन्नमसा गृणानोऽस्माकं बोध्यविता तनूनाम् ॥९॥
हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे एखादी नौका प्रवाशांना नदीच्या पैलतीरी सुखरूप घेऊन जाते त्याप्रमाणे आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सर्व कठीण संकटांतून आणि दुष्ट मार्गांतून सुखरूप पार करावे ही विनंती. ज्याप्रमाणे अत्रीऋषि आपली स्तुती करतात त्याप्रमाणे आम्ही नतमस्तक होऊन आपली स्तुती करत आहोत. आपण आमचे रक्षक व्हावे ही विनंती. ॥९ ॥

यस्त्वा हृदा कीरिणा मन्यमानोऽमर्त्यं मर्त्यो जोहवीमि ।
जातवेदो यशो अस्मासु धेहि प्रजाभिरग्ने अमृतत्वमश्याम् ॥१०॥
हे अग्निदेवा ! आम्ही भक्तगण मर्त्य असूनही अत्यंत श्रद्धापूर्वक हृदयापासून आपले चिंतन करत आपल्याला वारंवार बोलावत असतो. हे सर्वज्ञ जातवेदा ! आम्हांला यश आणि कीर्ती प्रदान करावी ही विनंती. हे अग्निदेवा ! आमच्या संततीद्वारे आम्ही वंशपरंपरेने अमरत्व प्राप्त करू शकू, असा आशीर्वाद आम्हाला द्यावा ही विनंती. ॥१ ० ॥

यस्मै त्वं सुकृते जातवेद उ लोकमग्ने कृणवः स्योनम् ।
अश्विनं स पुत्रिणं वीरवन्तं गोमन्तं रयिं नशते स्वस्ति ॥११॥
हे जातवेदा अग्निदेवा ! आपण ज्या सत्कर्म करणाऱ्या पुण्यवान भक्तगणांसाठी आशीर्वाद प्रदान करता, ते भक्तगण अश्व, पुत्र, शूरवीर आणि गोधनाने युक्त असे कल्याणकारी ऐश्वर्य प्राप्त करतात. ॥११ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५

ऋषि- वसुश्रुत वसुश्रुत आत्रेय **देवता** १ अग्नि; २- नराशंस ; ३- इळ; ४- बर्हि ; ५- देवी द्वार ६ उषासानक्ता; ७-दिव्य होता प्रचेतस; ८-सरस्वती, इळा, भारती; ९-त्वष्टा; १०-वनस्पति; ११ स्वाहाकृति **छन्द** – गायत्री

सुसमिद्धाय शोचिषे घृतं तीव्रं जुहोतन । अग्नये जातवेदसे ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! अत्यंत प्रदीप्त आणि दैदीप्यमान अशा, सर्वज्ञ जातवेद-अग्निदेवांसाठी तुम्ही उत्तम आणि शुद्ध घृताची आहुती अर्पण करा. ॥१ ॥

नराशंसः सुषूदतीमं यज्ञमदाभ्यः । कविर्हि मधुहस्त्यः ॥२॥
कोणाकडूनही पराभूत न होणाऱ्या (अदाभ्यः) माणसांनी ज्याची स्तुती केली आहे असे (नराशंसः) अग्निदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाला पूर्णत्वास नेवोत. अग्निदेव हिंसा न करणारे, बुद्धिमान आणि त्यांच्या हातामध्ये गोडवा असणारे आहेत. ॥२ ॥

ईळितो अग्न आ वहेन्द्रं चित्रमिह प्रियम् । सुखै रथेभिरूतये ॥३ ॥
हे वंदनीय (ईळितः)अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी सुखकारक रथात बसून येणाऱ्या, सर्वांना प्रिय असलेल्या आणि अद्भुत अशा इंद्रदेवांना यज्ञस्थळी घेऊन यावे ही विनंती. ॥३ ॥

ऊर्णम्रदा वि प्रथस्वाभ्यर्का अनूषत । भवा नः शुभ्र सातये ॥४॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! लोकरीसारखे कोमल, सुखद आसन पसरवले आहे कारण स्तुती करणारी ही मंगल स्तोत्रे सर्वत्र गुंजत आहेत. हे अग्निदेवा ! आपण आमच्या कल्याणासाठी आणि निवासासाठी सुखदायक व मंगलमय व्हावे ही विनंती. ॥४ ॥

देवीर्द्वारो वि श्रयध्वं सुप्रायणा न ऊतये । प्रप्र यज्ञं पृणीतन ॥५॥

हे दैवी प्रकाशमान द्वारा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी आपण सहज प्रवेश करण्यायोग्य मार्ग पूर्णपणे उघडा. आमच्या या यज्ञाला आपण उत्तम प्रकारे समृद्ध करावे ही विनंती. ॥५ ॥

सुप्रतीके वयोवृधा यह्वी ऋतस्य मातरा । दोषामुषासमीमहे ॥६ ॥

सुंदर रूप धारण करणाऱ्या, संपूर्ण सृष्टीला जीवनशक्ती देणाऱ्या, शाश्वत निसर्ग नियमांच्या (ऋत) जननी असणाऱ्या अशा 'रात्र' आणि 'दिवस' (उषा आणि नक्त) या दोन्ही महान शक्तींची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुती करतो. ॥६ ॥

वातस्य पत्मन्नीळिता दैव्या होतारा मनुषः । इमं नो यज्ञमा गतम् ॥७॥

वाऱ्याच्या वेगाने प्रवास करणाऱ्या, स्तुति केलेल्या, यज्ञात देवांचे आवाहन करणाऱ्या दोन दिव्य ऋत्विजांनो, यज्ञकर्त्यांनो, (होतारा) आम्हा मर्त्य जीवांच्या ह्या यज्ञात आगमन करावे . ॥७ ॥

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः । बर्हिः सीदन्त्वस्रिधः ॥८॥

अन्न आणि बुद्धीची देवी इळा, ज्ञानाची देवी सरस्वती आणि महाभूमीची देवी मही या सुख आणि कल्याण करणाऱ्या तिन्ही अविनाशी देवींनी आमच्या कुशाच्या आसनावर येऊन विराजमान व्हावे.॥८ ॥

शिवस्त्वष्टरिहा गहि विभुः पोष उत त्मना । यज्ञेयज्ञे न उदव ॥९ ॥

हे अथांग सामर्थ्य असलेल्या आणि पोषण करणाऱ्या त्वष्टादेवा! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये स्वतःहून यावे आणि आमच्या प्रत्येक यज्ञकर्मात आमचे उत्तम रक्षण करावे ही विनंती. ॥९ ॥

यत्र वेत्थ वनस्पते देवानां गुह्या नामानि । तत्र हव्यानि गामय ॥१० ॥

हे वनस्पती ! देवांची जी गुपित नावे आपल्याला ठाऊक आहेत, त्या त्या देवांच्या ठिकाणी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या हविष्यान्नाच्या आहुती पोहचवाव्यात ही विनंती. ॥१० ॥

स्वाहाग्नये वरुणाय स्वाहेन्द्राय मरुद्भ्यः । स्वाहा देवेभ्यो हविः ॥११ ॥

अग्निदेवांसाठी, वरुणदेवांसाठी, इंद्रदेवांसाठी, मरुद्गणांसाठी, सर्व देवतांसाठी यज्ञातील हविष्यान्नाच्या आहुती समर्पित असो. ॥११ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६

ऋषि- वसुश्रुत आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** – पंक्ति

अग्निं तं मन्ये यो वसुरस्तं यं यन्ति धेनवः ।

अस्तमर्वन्त आशवोऽस्तं नित्यासो वाजिन इषं स्तोतृभ्य आ भर ॥१॥

आम्ही भक्तगण अग्निदेवांना श्रेष्ठ मानतो, जे सर्वांना आश्रय आणि समृद्धी देणारे आहेत . ज्याप्रमाणे संध्याकाळी गायी आपल्या गोठ्याकडे परततात, वेगवान अश्व आपल्या तबेल्याकडे येतात आणि बलवान योद्धे आपल्या निवासाकडे परततात, त्याप्रमाणे सर्वजण अग्निदेवांकडे आश्रयासाठी येतात. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥१ ॥

सो अग्निर्यो वसुर्गृणे सं यमायन्ति धेनवः ।

समर्वन्तो रघुद्रुवः सं सुजातासः सूरय इषं स्तोतृभ्य आ भर ॥२॥

आम्ही भक्तगण अग्निदेवांची स्तुती करतो, जे सर्वांना आश्रय आणि समृद्धी देणारे आहेत. ज्यांच्याकडे दुभत्या गायी येतात, वेगवान व चपळ अश्व सुद्धा त्यांच्याकडे येतात अशा अग्निदेवांची उच्च कुळात जन्मलेले विद्वान भक्तगण उपासना करतात. असे गुण असलेल्या हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥२ ॥

अग्निर्हि वाजिनं विशे ददाति विश्वचर्षणिः ।

अग्नी राये स्वाभुवं स प्रीतो याति वार्यमिषं स्तोतृभ्य आ भर ॥३॥

सर्व भक्तगणांचे कल्याण करणारे अग्निदेव, आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांना सामर्थ्यशील अश्वाप्रमाणे शक्तिशाली सामर्थ्य प्रदान करतात. प्रसन्न झाल्यावर अग्निदेव यज्ञकर्त्या भक्तगणांना ऐश्वर्य मिळवून देण्यासाठी सहज प्राप्त होणारे श्रेष्ठ धन आणि सुख प्रदान करतात. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥३ ॥

आ ते अग्न इधीमहि द्युमन्तं देवाजरम् ।

यद्ध स्या ते पनीयसी समिद्दीदयति द्यवीषं स्तोतृभ्य आ भर ॥४॥

हे तेजस्वी अग्निदेवा! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला प्रदीप्त करतो. आपण प्रकाशमान आणि अविनाशी आहात. आपल्याला प्रदीप्त करण्याची क्रिया आकाशलोकांना प्रकाशमान करते. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥४ ॥

आ ते अग्न ऋचा हविः शुक्रस्य शोचिषस्पते ।

सुश्चन्द्र दस्म विश्पते हव्यवाट् तुभ्यं हूयत इषं स्तोतृभ्य आ भर ॥५॥

शुद्ध तेजाचे स्वामी, अद्भुत कार्य करणाऱ्या, संपूर्ण विश्वाचे स्वामी हे अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आपल्यासाठी स्तुतियुक्त स्त्रोत्रांनी हविष्यान्नाच्या आहुती अर्पण करत आहोत. त्या आपण देवांपर्यंत घेऊन जाव्यात ही विनंती. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥५ ॥

प्रो त्ये अग्नयोऽग्निषु विश्वं पुष्यन्ति वार्यम् ।

ते हिन्विरे त इन्विरे त इषण्यन्त्यानुषगिषं स्तोतृभ्य आ भर ॥६॥

वैश्विक अग्निदेव इतर अग्नींमधील सर्व आवश्यक संसाधनांचे पोषण करतात. हे आनंदमयी वैश्विक अग्निदेव प्रत्येकाला उदात्त मार्गावर प्रेरित करतात. अन्नाची इच्छा पूर्ण करणाऱ्या हे वैश्विक अग्निदेवा ! यज्ञकर्त्या भक्तगणांना अन्न, शक्ती आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥६ ॥

इतर अग्नि : पृथ्वीवरील अग्नि- लौकिक विस्तव, अंतरिक्षातील अग्नि- विजांच्या स्वरूपात असणारा वैद्युत अग्नि. आकाशातील अग्नि- सूर्य देवाच्या रूपातील, गार्हपत्य, आहवनीय आणि दक्षिणायन अग्नि, जठराग्नि

तव त्ये अग्ने अर्चयो महि व्राधन्त वाजिनः ।

ये पत्वभिः शफानां व्रजा भुरन्त गोनामिषं स्तोतृभ्य आ भर ॥७ ॥

हे अग्निदेवा ! आपल्या त्या प्रसिद्ध, अत्यंत वेगवान आणि शक्तिशाली ज्वाळा अन्न ग्रहण करून खूप मोठ्या प्रमाणावर वाढतात. ज्याप्रमाणे गायींचे

कळप आपल्या खुरांच्या गतीने गोठ्याकडे किंवा चराऊ कुरणांकडे धाव घेतात, त्याप्रमाणे आपल्या ज्वाळा सर्व दिशांना पसरतात. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥७॥

नवा नो अग्न आ भर स्तोतृभ्यः सुक्षितीरिषः ।

ते स्याम य आनृचुस्त्वादूतासो दमेदम इषं स्तोतृभ्य आ भर ॥८॥

हे अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी आपली भक्ती करण्यासाठी, नवीन, उत्तम निवासस्थान बनवण्याकरता प्रेरणा द्यावी ही विनंती. नेहमी पूज्य भावाने राहणारे आम्ही भक्तगण आपल्या ज्ञानाचा पवित्र संदेश घेऊन घराघरात पोहोचणारे दूत बनू. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥८॥

उभे सुश्चन्द्र सर्पिषो दर्वी श्रीणीष आसनि ।

उतो न उत्पुपूर्या उक्थेषु शवसस्पत इषं स्तोतृभ्य आ भर ॥९॥

सुवर्णासारख्या अलौकिक ऐश्वर्याने युक्त हे अग्निदेवा! आपण यज्ञातील दोन्ही पात्रांमधून अर्पण केलेल्या घृतयुक्त आहुती आपल्या मुखात ग्रहण करता. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥९॥

एवाँ अग्निमजुर्यमुर्गीर्भिर्यज्ञेभिरानुषक् ।

दधदस्मे सुवीर्यमुत त्यदाश्वश्व्यमिषं स्तोतृभ्य आ भर ॥१०॥

अशाप्रकारे यज्ञकर्ता भक्तगण आपल्या स्तुतिवचनांनी आणि अविरत यज्ञांच्या माध्यमातून अग्निदेवांना प्रसन्न करतो. अग्निदेव आम्हा भक्तगणांमध्ये उत्तम पराक्रम आणि अश्वा सारखी शीघ्रगती व शक्ती प्रदान करो ही विनंती. हे अग्निदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी अन्न आणि समृद्धी घेऊन यावे ही विनंती. ॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-७

ऋषि- वसुश्रुत आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** – अनुष्टुप्, १० पंक्ति

सखायः सं वः सम्यञ्चमिषं स्तोमं चाग्नये ।

वर्षिष्ठाय क्षितीनामूर्जो नप्त्रे सहस्वते ॥१॥

हे यज्ञकर्त्या भक्तगण मित्रांनो ! पृथ्वीवर राहणाऱ्यांमध्ये सर्वश्रेष्ठ, शत्रूंचा पराभव करणाऱ्या पराक्रमी, आंतरिक ऊर्जेचे रक्षण करणाऱ्या (ऊर्जो नप्त्रे) अशा अग्निदेवांसाठी, सर्वांनी संघटित होऊन, योग्य दिशेने जाणारी (सम्यञ्चम्), समृद्धीची इच्छा बाळगून स्तुतियुक्त स्तोत्रे प्रदान करावी. ॥१॥

कुत्रा चिद्यस्य समृतौ रण्वा नरो नृषदने ।

अर्हन्तश्चिद्यमिन्धते संजनयन्ति जन्तवः॥२ ॥

जे यज्ञवेदी मध्ये प्रकट झाल्यामुळे यज्ञकर्ते भक्तगण आनंदित होतात, ज्यांची यज्ञकर्ते भक्तगण स्तुती करतात, ज्यांना मंथन करून यज्ञवेदी प्रदीप्त केले जाते असे अग्निदेव कोठे आहेत? ॥२ ॥

सं यदिषो वनामहे सं हव्या मानुषाणाम् ।

उत द्युम्नस्य शवस ऋतस्य रश्मिमा ददे॥३॥

ज्यावेळी यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती अग्निदेव स्वीकार करतात त्यावेळी, अग्निदेव दिव्य तेजाचा, शक्तीचा आणि विश्वाच्या परम सत्याच्या स्वीकार करतात. ॥३॥

स स्मा कृणोति केतुमा नक्तं चिद्दूर आ सते ।

पावको यद्वनस्पतीन्प्र स्मा मिनात्यजरः॥४॥

जेव्हा पवित्र करणारे, कधीही क्षीण न होणारे अग्निदेव वनातील वृक्षांना वेगाने भस्मसात करतात, तेव्हा अग्निदेव रात्रीच्या घनदाट अंधारात सुद्धा यज्ञकर्त्या भक्तगणांना ज्ञान देणाऱ्या प्रकाशाचा मार्ग दाखवतात. ॥४ ॥

अव स्म यस्य वेषणे स्वेदं पथिषु जुह्वति ।

अभीमह स्वजेन्यं भूमा पृष्ठेव रुरुहुः॥५॥

ज्या अग्निदेवांच्या सेवेसाठी यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाच्या, कर्तव्याच्या, मार्गावर आपले कष्ट उपसतात ते स्वतःच्या बळावर प्राप्त करण्यायोग्य एखाद्या पर्वताच्या शिखरावर (उच्च पदावर) सन्मानाने विराजमान होतात.॥५ ॥

यं मर्त्यः पुरुस्पृहं विदद्विश्वस्य धायसे ।

प्र स्वादनं पितूनामस्ततातिं चिदायवे॥६॥

मर्त्य यज्ञकर्ते भक्तगण, सर्व विश्वाचे पोषण करणाऱ्या, वेगवेगळ्या अन्नपदार्थांना चवदार बनवणाऱ्या, निवासस्थान प्रदान करणाऱ्या, सर्वांचे प्रिय असलेल्या अग्निदेवांना चांगल्या प्रकारे ओळखतात. ॥६ ॥

स हि ष्मा धन्वाक्षितं दाता न दात्या पशुः ।

हिरिश्मश्रुः शुचिदन्नृभुरनिभृष्टतविषिः॥७॥

जसा पशु गवत खाऊन जागा साफ करतो त्याप्रमाणे झाडे-लाकडे आणि वाळलेल्या गवताने निर्जल भूमीला अग्निदेव भस्मसात करतात. सोनेरी दाढी-मिशा असलेले (हिरिश्मश्रु), अतिशय पवित्र चमकणारे दात असलेले (शुचिदन्), अग्निदेव अजिंक्य शक्तीने संपन्न आहेत. ॥७ ॥.

शुचिः ष्म यस्मा अत्रिवत्प्र स्वधितीव रीयते ।

सुषूरसूत माता क्राणा यदानशे भगम्॥८॥

अत्रिऋषींप्रमाणे भक्तगण अत्यंत पवित्र आणि तेजस्वी अग्निदेवांची सेवा करतात. त्याच्या सर्व संकटांचा आणि अंधाराचा नाश करण्यासाठी अग्निदेव धारधार शस्त्रासारख्या (कुऱ्हाडी सारख्या) वेगाने धावून येतात. कल्याणाचे मार्ग निर्माण करणारी आणि उत्तम गुणांना जन्म देणारी माता ज्या अग्निदेवांना जन्म देते ते अग्निदेव आपल्या भक्तगणांना अंतिम सुख आणि परम ऐश्वर्य प्राप्त करून देतात. ॥८ ॥

आ यस्ते सर्पिरासुतेऽग्ने शमस्ति धायसे ।

ऐषु द्युम्नमुत श्रव आ चित्तं मर्त्येषु धाः॥९ ॥

हे घृताची आहुती स्वीकारणाऱ्या अग्निदेवा (सर्पिरासुते अग्ने)! सृष्टीचे धारण आणि पोषण करणाऱ्या आपल्या रूपापासून, जे सुख आणि शांती प्राप्त होते, ते रूप, भक्तगणांचे कल्याण करणारे आहे. हे अग्निदेवा !आपल्या मानवी भक्तगणांमध्ये दिव्यवैभव व ज्ञान, उत्तम कीर्ती, अन्न आणि शुद्ध सद्सद्विवेक बुद्धि पूर्णपणे प्रस्थापित करावी ही विनंती. ॥९ ॥

इति चिन्मन्युमध्रिजस्त्वादातमा पशुं ददे ।

आदग्ने अपृणतोऽत्रिः सासह्यादस्यूनिषः सासह्यान्नॄन्॥१०॥

हे अग्निदेवा! दृढनिश्चयी असलेले अत्रिऋषी आपण प्रदान केलेला पशुधनरूपी प्रसाद आनंदाने स्वीकारतात. हे अग्निदेवा! यानंतर यज्ञ न करणाऱ्या लोकांना, दस्यूंना हे अत्रिऋषी आपल्या सामर्थ्याने वारंवार पराभूत करोत ॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-८

ऋषि- इष आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** – जगती

त्वामग्न ऋतायवः समीधिरे प्रत्नं प्रत्नास ऊतये सहस्कृत ।

पुरुश्चन्द्रं यजतं विश्वधायसं दमूनसं गृहपतिं वरेण्यम् ॥१॥

हे मंथनाने प्रकट झालेल्या अग्निदेवा! स्वतःच्या रक्षणाची आणि कल्याणाची इच्छा करणाऱ्या प्राचीन ऋषींनी आणि सत्यमार्गावर चालणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्याला प्रदीप्त केले. आपण अतिप्राचीन, अत्यंत आनंददायी, पूजनीय, संपूर्ण विश्वाचे पालनपोषण करणारे, शांतचित्त असलेले, घराचे रक्षक आणि सर्वांत श्रेष्ठ आहात. ॥१॥

त्वामग्ने अतिथिं पूर्व्यं विशः शोचिष्केशं गृहपतिं नि षेदिरे ।

बृहत्केतुं पुरुरूपं धनस्पृतं सुशर्माणं स्ववसं जरद्विषम् ॥२॥

हे अग्निदेवा ! यज्ञकर्त्यांनी आपल्याला प्राचीन अतिथी आणि घराचा स्वामी (गृहपती) म्हणून आपल्या यज्ञवेदी मध्ये स्थापित केले आहे. आपण तेजस्वी ज्वाळारूपी केसांनीयुक्त, विशाल कीर्ती असलेले, अनेक रूपांमध्ये प्रकट होणारे, धन आणि समृद्धी देणारे, उत्तम सुख देणारे आणि शत्रूंचा नाश करणारे आहात. ॥२॥

त्वामग्ने मानुषीरीळते विशो होत्राविदं विविचिं रत्नधातमम् ।

गुहा सन्तं सुभग विश्वदर्शतं तुविष्वणसं सुयजं घृतश्रियम् ॥३॥

हे अग्निदेवा ! यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतात. आपण यज्ञाच्या विधींचे उत्तम ज्ञाते, सत्य आणि असत्याचा निवाडा करणारे, श्रेष्ठ रत्ने प्रदान करणारे आहात. हे अग्निदेवा! आपण सर्व विश्वाला प्रकाशित करणारे, दिव्य ध्वनीयुक्त, उत्तम प्रकारे यज्ञ पूर्ण करणारे, घृताने शोभायमान होणारे , गुहेमध्ये वास करून राहणारे आहात. ॥३ ॥

त्वामग्ने धर्णसिं विश्वधा वयं गीर्भिर्गृणन्तो नमसोप सेदिम ।

स नो जुषस्व समिधानो अङ्गिरो देवो मर्तस्य यशसा सुदीतिभिः ॥४॥

हे सर्वांना आधार देणाऱ्या, संपूर्ण सृष्टीचे पोषण करणाऱ्या प्रदीप्त झालेल्या, तेजस्वी अग्निदेवा ! आम्ही भक्तगण नतमस्तक होऊन स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत आपल्या चरणी आलो आहोत . हे तेजस्वी अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करून आमच्यावर प्रसन्न व्हावे ही विनंती. ॥४ ॥

त्वमग्ने पुरुरूपो विशेविशे वयो दधासि प्रत्नथा पुरुष्टुत ।

पुरूण्यन्ना सहसा वि राजसि त्विषिः सा ते तित्विषाणस्य नाधृषे ॥५॥

हे अनेक रूपे धारण करणाऱ्या, अनेकांनी स्तुती केलेल्या अग्निदेवा! आपण सनातन काळापासून प्रत्येक भक्तगणांसाठी अन्न आणि जीवनशक्ती प्रदान करता. अनेक प्रकारच्या हविष्यान्नाचा उपभोग घेऊन आपण दिव्यरूपात प्रकाशमान होता. अत्यंत तीव्रतेने प्रदीप्त झालेल्या आपल्या तेजाला आव्हान देणे कोणालाही शक्य नाही. ॥५ ॥

त्वामग्ने समिधानं यविष्ठ्य देवा दूतं चक्रिरे हव्यवाहनम् ।
उरुज्रयसं घृतयोनिमाहुतं त्वेषं चक्षुर्दधिरे चोदयन्मति ॥६ ॥
अत्यंत तरुण आणि तेजस्वी हे अग्निदेवा ! यज्ञामध्ये देवांनी आपल्याला हविष्यान्नाची आहुती वाहून नेण्यासाठी दूत म्हणून नियुक्त केले. प्रचंड वेग असलेल्या, घृताचे उगमस्थान असलेल्या आणि आहुती देऊन आवाहन केलेल्या हे अग्निदेवा! बुद्धीला सत्प्रेरणा देणाऱ्या भक्तगणांनी आपल्याला मार्गदर्शकाप्रमाणे स्थापित केले आहे. ॥६ ॥

त्वामग्ने प्रदिव आहुतं घृतैः सुम्नायवः सुषमिधा समीधिरे ।
स वावृधान ओषधीभिरुक्षितोऽभि ज्रयांसि पार्थिवा वि तिष्ठसे ॥७ ॥
हे अग्निदेवा !प्राचीन काळापासून सुखाची इच्छा करणारे यज्ञकर्ते भक्तगण उत्तम समिधा आणि घृताच्या आहुती देऊन आपल्या यज्ञामध्ये प्रज्ज्वलित करत आले आहेत. आपण वनस्पतींच्या रसाने सिंचित होऊन,वृद्धिंगत होत, या पृथ्वीवरील सर्व विस्तृत क्षेत्रांना आपल्या प्रकाशाने व्यापून टाकता. ॥७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-९

ऋषि- गय आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ५, ७ पंक्ति

त्वामग्ने हविष्मन्तो देवं मर्तास ईळते ।

मन्ये त्वा जातवेदसं स हव्या वक्ष्यानुषक् ॥१॥

हे दिव्य गुणसंपन्न अग्निदेवा! हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे आम्ही मर्त्य भक्तगण, आपली स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रार्थना करतो. हे सर्व प्राण्यांचे जन्मापासून ज्ञान असलेल्या जातवेदा अग्निदेवा! आम्ही भक्तगणांनी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती योग्य प्रकारे देवांपर्यंत पोहोचवावी ही विनंती॥१॥

अग्निर्होता दास्वतः क्षयस्य वृक्तबर्हिषः ।

सं यज्ञासश्चरन्ति यं सं वाजासः श्रवस्यवः ॥२॥

दानशूर आणि यज्ञासाठी दर्भापासून सुबकपणे आसन तयार करणाऱ्या (वृक्तबर्हिषः) यज्ञकर्त्या भक्तगणांच्या निवासस्थानी अग्निदेव मुख्य पुरोहित असतात. कीर्ती आणि अन्नशक्ती मिळवण्याची इच्छा असणारे भक्तगणांचे सर्व यज्ञ अग्निदेवांसाठी असतात. ॥२ ॥

उत स्म यं शिशुं यथा नवं जनिष्टारणी ।

धर्तारं मानुषीणां विशामग्निं स्वध्वरम् ॥३॥

ज्याप्रमाणे माता-पिता आपल्या नवजात बालकाला जन्म देतात, त्याचप्रमाणे यज्ञकर्ते भक्तगण दोन अरणींच्या घर्षणातून अग्निदेवांना जन्म देतात. अग्निदेव पालन पोषण करतात आणि यज्ञाला सुशोभित करतात . ॥३ ॥

उत स्म दुर्गृभीयसे पुत्रो न ह्वार्याणाम् ।

पुरू यो दग्धासि वनाग्ने पशुर्न यवसे ॥४॥

ज्याना पकडणे अत्यंत कठीण आहे अशा अग्निदेवा ! ज्याप्रमाणे एखादा भुकेलेला पशू गवताच्या कुरणामध्ये शिरून गवत ओरबाडून खातो, त्याचप्रमाणे आपण जंगलात शिरून मोठ्या प्रमाणावर वने जाळून भस्मसात करता. ॥4 ॥

अध स्म यस्यार्चयः सम्यक्संयन्ति धूमिनः ।

यदीमह त्रितो दिव्युप ध्मातेव धमति शिशीते ध्मातरी यथा ॥५॥

जसा भाता फुंकणारा लोहार अग्निदेवांना प्रदीप्त करतो त्याप्रमाणे, जेव्हा काम, क्रोध आणि लोभ या तीन (त्रितो) दोषांवर विजय मिळवलेला भक्तगण, बुद्धिरूपी प्रकाशात अज्ञानाच्या धुराचा नाश करतो. ॥५ ॥

तवाहमग्न ऊतिभिर्मित्रस्य च प्रशस्तिभिः ।

द्वेषोयुतो न दुरिता तुर्याम मर्त्यानाम् ॥६ ॥

हे अग्निदेवा! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण मैत्रीपूर्ण भावनांनी आपली स्तुती करतो. आपण आपल्या संरक्षक शक्तीने आमचे रक्षण करावे आणि आणि आम्हाला पापकर्मांपासून व द्वेष बाळगणाऱ्या बाह्य शत्रूंपासून मुक्त करावे ही विनंती॥६॥

तं नो अग्ने अभी नरो रयिं सहस्व आ भर ।

स क्षेपयत्स पोषयद्भुवद्वाजस्य सातय उतैधि पृत्सु नो वृधे ॥७ ॥

हे बलशाली अग्निदेवा! आपण आम्हाला शत्रूंना पळवून लावण्याचे सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती. आपण आमच्या शत्रूंचा नाश करून अन्न आणि शक्ती मिळवून देणारे ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. हे अग्निदेवा! युद्धात, आमच्या रक्षणासाठी आमची पाठ राखण करावी ही विनंती. ॥७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१०

ऋषि- गय आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ४ , ७ पंक्ति

अग्न ओजिष्ठमा भर द्युम्नमस्मभ्यमध्रिगो ।

प्र नो राया परीणसा रत्सि वाजाय पन्थाम्॥१॥

ज्याची गती कोणीही रोखू न शकणाऱ्या (अध्रिगो) हे अग्निदेवा! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अमाप शक्तिशाली ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आपल्या अथांग आणि विपुल धनाने समृद्धी आणून, आमच्या प्रगतीचा आणि विजयाचा मार्ग मोकळा करावा ही विनंती. ॥१॥

त्वं नो अग्ने अद्भुत क्रत्वा दक्षस्य मंहना ।

त्वे असुर्यमारुहत्क्राणा मित्रो न यज्ञियः ॥२॥

हे आश्चर्यकारक अग्निदेवा! आपण आमच्या आमच्या यज्ञांनी आणि इतर विधींनी प्रसन्न होऊन, आम्हाला धनधान्य प्रदान करावे ही विनंती. महान दैवीशक्तीने परिपूर्ण असलेल्या हे अग्निदेवा! सूर्यदेवांप्रमाणे आमचा यज्ञ पुरा करावा ही विनंती. ॥२ ॥

त्वं नो अग्न एषां गयं पुष्टिं च वर्धय ।

ये स्तोमेभिः प्र सूरयो नरो मघान्यानशुः॥३ ॥

हे अग्निदेवा ! समाजाला योग्य दिशा दाखवणाऱ्या, आपली स्तुती करणाऱ्या आम्हा भक्तगणांच्या समृद्धीत वाढ करावी, आम्हाला आमच्या या स्तुतीगीतांच्या माध्यमातून उत्कृष्ट ऐश्वर्य आणि धनप्रदान करावे ही विनंती॥३॥

ये अग्ने चन्द्र ते गिरः शुम्भन्त्यश्वराधसः ।

शुष्मेभिः शुष्मिणो नरो दिवश्चिद्येषां बृहत्सुकीर्तिर्बोधति त्मना ॥४ ॥

हे आल्हाददायक आणि तेजस्वी अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रार्थना करतात त्यांना अश्वांचे ऐश्वर्य प्राप्त होते. आपल्या पराक्रमाने अशा भक्तगणांचे बल वृद्धिंगत होते. या बलवान भक्तगणांची कीर्ति स्वर्गापर्यंत पसरून सर्वजणांना ज्ञात होते ॥४ ॥

तव त्ये अग्ने अर्चयो भ्राजन्तो यन्ति धृष्णुया ।

परिज्मानो न विद्युतः स्वानो रथो न वाजयुः ॥५ ॥

हे अग्निदेवा ! आकाशात सर्व बाजूंनी चमचमणाऱ्या विजेप्रमाणे आणि वेगाने धावताना मोठा आवाज करणाऱ्या पराक्रमी रथाप्रमाणे, आपल्या त्या दीप्यमान व तेजस्वी ज्वाळा अत्यंत वेगाने आणि धैर्याने सर्व दिशांना पसरतात. ॥५ ॥

नू नो अग्न ऊतये सबाधसश्च रातये ।

अस्माकासश्च सूरयो विश्वा आशास्तरीषणि ॥६॥

हे अग्निदेवा ! संकटांनी वेढलेल्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी आणि ऐश्वर्य प्रदान करण्यासाठी आपण शीघ्रतेने प्रसन्न व्हावे ही विनंती. आम्हा भक्तगणांचे वंशज सुद्धा आपली स्तुती करून त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करोत. ॥६ ॥

त्वं नो अग्ने अङ्गिरः स्तुतः स्तवान आ भर ।

होतर्विभ्वासहं रयिं: स्तोतृभ्यः स्तवसे च न उतैधि पृत्सु नो वृधे ॥७॥

आङ्गिरस ऋषींच्या वंशातील ऋषींनी ज्याची स्तुती केली आहे अशा हे अग्निदेवा! भूतकाळात आणि वर्तमानकाळातही भक्तगणांनी आपली स्तुती केली आहे. हे अग्निदेवा ! आम्हा भक्तांसाठी सर्व शत्रूंना आणि संकटांना पराभूत करणारे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करावे आणि जीवनाच्या युद्धात आपण आमच्या प्रगती आणि विजयासाठी पाठराखण करावी ही विनंती ॥७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-११

ऋषि- सुतम्भर आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** जगती

जनस्य गोपा अजनिष्ट जागृविरग्निः सुदक्षः सुविताय नव्यसे ।
घृतप्रतीको बृहता दिविस्पृशा द्युमद्वि भाति भरतेभ्यः शुचिः॥१॥

मानवांचे रक्षण करणारे, सदैव जागृत राहणारे आणि अत्यंत कार्यकुशल असणारे अग्निदेव नवीन व उत्तम ऐश्वर्य प्राप्तीसाठी प्रकट झाले आहेत. घृताने चमकणारे, अत्यंत पवित्र असणारे अग्निदेव आपल्या आकाशाला स्पर्श करणाऱ्या विशाल ज्वाळांनी यज्ञ करणाऱ्या आणि सृष्टीचे पोषण करणाऱ्या भक्तांसाठी अत्यंत तेजस्वीपणे प्रकाशित होतात ॥१॥

यज्ञस्य केतुं प्रथमं पुरोहितमग्निं नरस्त्रिषधस्थे समीधिरे ।
इन्द्रेण देवैः सरथं स बर्हिषि सीदन्नि होता यजथाय सुक्रतुः ॥२ ॥

यज्ञ कर्माचे मुख्य ध्वजा असलेले, प्रथम यज्ञकर्त्या अग्निदेवांना ज्ञानी यज्ञकर्ते भक्तगण तिन्ही काळ प्रदीप्त करतात. श्रेष्ठ संकल्प करणारे यज्ञ पार पाडणारे अग्निदेव, इंद्रदेवांच्या सोबत आणि इतर दिव्य शक्तींसह एकाच रथावर आरूढ होऊन कुशाच्या आसनावर विराजमान होवोत . ॥२ ॥

असम्मृष्टो जायसे मात्रोः शुचिर्मन्द्रः कविरुदतिष्ठो विवस्वतः ।

घृतेन त्वावर्धयन्नग्न आहुत धूमस्ते केतुरभवद्दिवि श्रितः॥३ ॥

हे आदरपूर्वक आहुती दिलेल्या अग्निदेवा ! आपण अत्यंत पवित्र, आनंदस्वरूप आणि सर्वज्ञ आहात. दोन मातांपासून (दोन अरणींच्या मंथनातून) कोणाच्याही सहाय्याशिवाय आपण अत्यंत शुद्ध स्वरूपात प्रकट होता. आपल्याला यज्ञकर्त्या भक्तगणांनी घृताच्या आहुतीने प्रदीप्त केल्यावर आकाश लोकांपर्यंत पोहचणारा आपला धूर ध्वजा प्रमाणे फडकतो. ॥३ ॥

अग्निर्नो यज्ञमुप वेतु साधुयाग्निं नरो वि भरन्ते गृहेगृहे ।

अग्निर्दूतो अभवद्धव्यवाहनोऽग्निं वृणाना वृणते कविक्रतुम्॥४ ॥

सर्व परोपकारी कर्म करणारे अग्निदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाचा स्वीकार करोत. भक्तगण अग्निदेवांना आपल्या घराघरात प्रदीप्त करतात. हविष्यान्नाची आहुती वाहून नेणारे अग्निदेव देवांचे दूत आहेत. यज्ञकर्ते भक्तगण त्रिकालज्ञानी आणि शक्तिशाली अग्निदेवांना मनापासून स्वीकारतात ॥४ ॥

तुभ्येदमग्ने मधुमत्तमं वचस्तुभ्यं मनीषा इयमस्तु शं हृदे ।

त्वां गिरः सिन्धुमिवावनीर्महीरा पृणन्ति शवसा वर्धयन्ति च॥५॥

हे अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांची मधुर स्तोत्रे आपल्यासाठीच आहेत. आमच्या प्रार्थनांमुळे आपल्या हृदयाला आनंद मिळो. ज्याप्रमाणे रक्षण

करणाऱ्या नद्या सर्व बाजूंनी वाहून समुद्राला तृप्त करतात, त्याचप्रमाणे आमची स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्याला बळकट करोत आणि आपल्या शक्ती वृद्धिंगत करोत. ॥५ ॥

त्वामग्ने अङ्गिरसो गुहा हितमन्वविन्दञ्छिश्रियाणं वनेवने ।

स जायसे मथ्यमानः सहो महत्त्वामाहुः सहसस्पुत्रमङ्गिरः ॥६ ॥

हे अग्निदेवा ! प्रत्येक वनामध्ये आणि वृक्षांच्या गुहेत लपून राहिलेल्या व आश्रय घेतलेल्या आपल्याला आङ्गिरस ऋषींनी शोधून काढले. दोन अरणींमध्ये मंथन करून आपण प्रकट होता. अफाट शक्ती व प्रयत्नातून आपला जन्म असल्यामुळेच सर्व विद्वान आपल्याला 'शक्तीचा पुत्र' म्हणतात. ॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१२

ऋषि- सुतम्भर आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

प्राग्नये बृहते यज्ञियाय ऋतस्य वृष्णे असुराय मन्म ।

घृतं न यज्ञ आस्ये सुपूतं गिरं भरे वृषभाय प्रतीचीम् ॥१॥

महान, यज्ञास पात्र, विश्वाच्या सत्य नियमांचे रक्षण करणाऱ्या, सिंचन करणाऱ्या, शक्तिशाली आणि दैवी सामर्थ्य असलेल्या अग्निदेवांसाठी आम्ही यज्ञकर्ते भक्तीभावाने स्तोत्रे अर्पण करतो. यज्ञामध्ये ज्या प्रमाणे शुद्ध केलेले पवित्र घृत अर्पण केले जाते, त्या प्रमाणे सामर्थ्यशाली अग्निदेवांना आम्ही भक्तगण आमची पवित्र आणि शुद्ध स्तोत्रे अर्पण करतो ॥१॥.

ऋतं चिकित्व ऋतमिच्चिकिद्ध्यृतस्य धारा अनु तृन्धि पूर्वीः ।

नाहं यातुं सहसा न द्वयेन ऋतं सपाम्यरुषस्य वृष्णः॥२ ॥

हे अग्निदेवा! विश्वाच्या परम सत्याचे रक्षण करत आपण आमच्या स्तुतीचा स्वीकार करावा. आपण आमच्या प्रार्थना जाणता. आम्ही बळजबरीने यज्ञविधी नष्ट करत नाही, तसेच आम्ही वैदिक कार्याविरुद्ध कोणतेही कृत्य करत नाही. आम्ही तेजस्वी आणि इच्छित फलप्राप्ती करणाऱ्या अग्निदेवांची स्तुती करतो. ॥२ ॥

कया नो अग्न ऋतयन्नृतेन भुवो नवेदा उचथस्य नव्यः ।

वेदा मे देव ऋतुपा ऋतूनां नाहं पतिं सनितुरस्य रायः॥३ ॥

हे अग्निदेवा ! सत्याचे आचरण करणारे आपण कोणत्या उपायाने आमच्या या नवीन स्तोत्रांना जाणणारे व्हाल ? नियमांचे रक्षण करणारे अग्निदेव आम्हा भक्तगणांच्या सर्व प्रार्थना जाणतात. आम्हाला प्राप्त झालेल्या या ऐश्वर्याचे खरे स्वामी आम्ही नाही, तर ते धन देणारे अग्निदेवच खरे स्वामी आहेत. ॥३ ॥

के ते अग्ने रिपवे बन्धनासः के पायवः सनिषन्त द्युमन्तः ।

के धासिमग्ने अनृतस्य पान्ति क आसतो वचसः सन्ति गोपाः॥४ ॥

हे अग्निदेवा! शत्रूला बांधून ठेवणारे आपले ते तेजस्वी रक्षक कोण आहेत? आम्हाला सुखाचा लाभ कोण करून देतात? असत्याचा नाश करून सत्याच्या आधाराचे रक्षण करणारे कोण आहेत? दुष्ट, खोट्या वागणुकीपासून किंवा वाणीपासून आमचे रक्षण करणारे पालनकर्ते कोण आहेत? ॥४ ॥

सखायस्ते विषुणा अग्न एते शिवासः सन्तो अशिवा अभूवन् ।

अधूर्षत स्वयमेते वचोभिऋजूयते वृजिनानि ब्रुवन्तः॥५ ॥

हे अग्निदेवा! जे पूर्वी आपले कल्याणकारी मित्र होते, तेच आता अकल्याणकारी शत्रू बनले आहेत. आपल्यासारख्या सरळ आणि सत्यमार्गी

देवाशी कपटाने व कुटिलतेने वागणारे, त्यांच्या खोट्या व्यवहारामुळे नष्ट झाले. ॥५॥

यस्ते अग्ने नमसा यज्ञमीट्ट ऋतं स पात्यरुषस्य वृष्णः ।

तस्य क्षयः पृथुरा साधुरेतु प्रसर्स्राणस्य नहुषस्य शेषः॥६ ॥

हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण भक्तीभावाने व आदराने आपली उपासना करतात ते सत्याचे रक्षण करतात. सतत प्रगती करणाऱ्या आणि मानवांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या अशा भक्तगणांचे निवासस्थान विस्तीर्ण आणि कल्याणकारी असो आणि त्याची संततीही समृद्ध होवो ही विनंती. ॥६॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१३

ऋषि- सुतम्भर आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** गायत्री

अर्चन्तस्त्वा हवामहेऽर्चन्तः समिधीमहि । अग्ने अर्चन्त ऊतये ॥१॥

हे अग्निदेवा! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करत आपल्याला आवाहन करत, आमच्या रक्षणाकरता आपल्याला समिधा अर्पण करत प्रदीप्त करत आहोत . ॥१॥

अग्नेः स्तोमं मनामहे सिध्रमद्य दिविस्पृशः । देवस्य द्रविणस्यवः ॥२॥

ऐश्वर्याची इच्छा करणारे आम्ही, यज्ञकर्ते भक्तगण, आज या शुभदिवशी,सर्व कार्ये सिद्ध करणाऱ्या, स्वर्गाला स्पर्श करणाऱ्या, अग्निदेवांची मनःपूर्वक स्तुती करतो ॥२ ॥

अग्निर्जुषत नो गिरो होता यो मानुषेष्वा । स यक्षद्दैव्यं जनम् ॥३॥

यज्ञा मधील मुख्य यज्ञकर्ते अग्निदेव, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करोत ही विनंती. हे अग्निदेवा ! आपण दिव्य देवतांना आमच्या यज्ञात घेऊन यावे ही विनंती ॥३ ॥

त्वमग्ने सप्रथा असि जुष्टो होता वरेण्यः । त्वया यज्ञं वि तन्वते ॥४॥

हे अग्निदेवा ! आपण अत्यंत कीर्तिमान, अत्यंत श्रेष्ठ, सर्वांचे प्रिय यज्ञकर्ते आहात. आपल्या सहाय्याने यज्ञकर्ते भक्तगण यज्ञकार्य संपन्न करतात. ॥४ ॥

त्वामग्ने वाजसातमं विप्रा वर्धन्ति सुष्टुतम् । स नो रास्व सुवीर्यम् ॥५॥

उत्तम प्रकारे स्तुती केलेल्या आणि अत्यंत श्रेष्ठ बल देणाऱ्या हे अग्निदेवा ! सर्व ज्ञानी व बुद्धिमान यज्ञकर्ते भक्तगण आपल्या स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपली कीर्ती वाढवत आहेत. आपण आम्हा भक्तगणांना उत्तम शौर्य आणि पराक्रमी बल प्रदान करावे ही विनंती. ॥५ ॥

अग्ने नेमिरराँ इव देवाँस्त्वं परिभूरसि । आ राधश्चित्रमृञ्जसे ॥६ ॥

हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे रथाच्या चाकाच्या बाहेरील कडा (धावा) सर्व आऱ्यांना धरून ठेवते त्याप्रमाणे विश्वातील सर्व देवतांना आपण आपल्यामध्ये सामावून घेता. हे अग्निदेवा ! आम्हाला विविधांगी आणि अद्भुत ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१४

ऋषि- सुतम्भर आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** गायत्री

अग्निं स्तोमेन बोधय समिधानो अमर्त्यम् । हव्या देवेषु नो दधत् ॥१॥

यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आपल्या उत्तम स्तुतियुक्त स्तोत्रांनी अमर अग्निदेवांना जागृत करा जेणेकरून अग्निदेव यज्ञामध्ये अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचवतील. ॥१॥

तमध्वरेष्वीळते देवं मर्ता अमर्त्यम् । यजिष्ठं मानुषे जने ॥२॥

मृत्यूचे भय असलेले यज्ञकर्ते भक्तगण, मानवांमध्ये प्रकट झालेल्या, कधीही नष्ट न होणाऱ्या, यज्ञाचे उत्तम प्रकारे फळ देणाऱ्या, सर्व देवांमध्ये सर्वश्रेष्ठ, पूजनीय अग्निदेवांची आपल्या यज्ञांमध्ये स्तुती करतात. ॥२ ॥

तं हि शश्वन्त ईळते स्रुचा देवं घृतश्चुता । अग्निं हव्याय वोळ्हवे ॥३॥

स्रुवा मधून घृताच्या धारा सतत टपकत आहेत अशा स्रुवा हातात धरून यज्ञकर्ते भक्तगण प्रकाशमान अग्निदेवांची स्तुती करतात, त्यामुळे अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती अग्निदेव इतर देवांपर्यंत वाहून नेतात. ॥३ ॥

अग्निर्जातो अरोचत घ्नन्दस्यूञ्ज्योतिषा तमः ।

अविन्दद्गा अपः स्वः ॥४॥

अरणीच्या मंथनातून प्रकट झालेले अग्निदेव आपल्या तेजाने अंध:कार आणि दुष्ट दस्यूंचा नाश करत दैदीप्यमान झाले. या अग्निदेवांमुळे गायी, जल आणि प्रकाश प्रकट होतात. ॥४ ॥

अग्निमीळेन्यं कविं घृतपृष्ठं सपर्यत । वेतु मे शृणवद्धवम् ॥५॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो आपण स्तुतीस पात्र, भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या आणि घृताच्या आहुतीने प्रकाशमान झालेल्या अग्निदेवांची उपासना करावी. हे अग्निदेवा ! आपण भक्तगणांच्या प्रार्थनेचा स्वीकार करावा, त्यांची आवाहने ऐकावीत ही विनंति ॥५ ॥

अग्निं घृतेन वावृधुः स्तोमेभिर्विश्वचर्षणिम् । स्वाधीभिर्वचस्युभिः ॥६॥

उत्तम बुद्धीने युक्त आणि स्तुती करण्याची इच्छा बाळगणाऱ्या भक्तगणांनी आपल्या स्तोत्रांद्वारे आणि घृताच्या आहुतींनी, संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणाऱ्या अग्निदेवांना प्रदीप्त केले आहे .॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१५

ऋषि- धरुण आङ्गिरस **देवता** – अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

प्र वेधसे कवये वेद्याय गिरं भरे यशसे पूर्व्याय ।
घृतप्रसत्तो असुरः सुशेवो रायो धर्ता धरुणो वस्वो अग्निः ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, सर्वज्ञ, सृष्टीचे निर्माते, जाणण्यास अत्यंत योग्य, कीर्तिमान, अनादि काळापासून असलेल्या, अग्निदेवांना स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करतो. घृताच्या आहुतीने तृप्त होणारे अग्निदेव, सर्वांना जीवनशक्ती देणारे, परम कल्याणकारी, संपूर्ण सृष्टीला ऐश्वर्य देणारे आहेत. ॥१॥

ऋतेन ऋतं धरुणं धारयन्त यज्ञस्य शाके परमे व्योमन् ।
दिवो धर्मन्धरुणे सेदुषो नॄञ्जातैरजाताँ अभि ये ननक्षुः ॥२ ॥
सत्य आणि वैश्विक नियमांच्या आधारे, यज्ञाच्या सामर्थ्याने जगाला धारण करणाऱ्या, यज्ञवेदीमध्ये प्रदीप्त होणाऱ्या, जन्मलेल्या आणि न जन्मलेल्या सर्व जीवांना व्यापून ठेवले आहे अशा अग्निदेवांना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण नमन करतो. ॥२ ॥

अङ्होयुवस्तन्वस्तन्वते वि वयो महद्दुष्टरं पूर्व्याय ।
स संवतो नवजातस्तुतुर्यात्सिङ्हं न क्रुद्धमभितः परि ष्ठुः ॥३ ॥

जे भक्तगण निष्पाप बनून, ज्ञानाचा विस्तार करतात, अनादि, सनातन अग्निदेवांसाठी महान आणि इतरांना पार करण्यास कठीण कर्मे करतात, ते, नवीन जन्म घेतल्या प्रमाणे शुद्ध झालेले, यज्ञकर्ते भक्तगण समोर येणाऱ्या सर्व शत्रूंना, एखादा क्रोधित सिंह इतर हिंस्र पशूंना सहज पराभूत करतो त्या प्रमाणे, सहज पराभूत करतात. ॥३ ॥

मातेव यद्धरसे पप्रथानो जनंजनं धायसे चक्षसे च ।

वयोवयो जरसे यद्दधानः परि त्मना विषुरूपो जिगासि ॥४॥

हे अग्निदेवा ! आपण सर्वव्यापी होऊन, एका मातेप्रमाणे प्रत्येकाचे पोषण करता, सर्वांचे जीवन जगवता आणि पाहण्यासाठी प्रकाश देता, प्रत्येक अन्नाला पचवून आणि प्रत्येकाला आयुष्य देऊन विविध रूपे धारण करून सर्वत्र संचार करता. ॥४ ॥

वाजो नु ते शवसस्पात्वन्तमुरुं दोघं धरुणं देव रायः ।

पदं न तायुर्गुहा दधानो महो राये चितयन्नत्रिमस्पः ॥५ ॥

हे प्रकाशमान अग्निदेवा !आपण पराक्रमाचे रक्षण करणारे, महान आधार देणारे आणि दुभत्या गायींप्रमाणे इच्छा पूर्ण करणाऱ्या विस्तीर्ण धनाचे स्वामी आहात . ज्याप्रमाणे एखादा चोर गुहेमध्ये आपले धन लपवून ठेवतो, त्याप्रमाणे आपण आपले स्थान गुहेत ठेवता. सर्वांना जागरूक करणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण अत्रीऋषींना संकटातून मुक्त केले. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१६

ऋषि- पूरु आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** त्रिष्टुप् ५ पंक्ति

बृहद्वयो हि भानवेऽर्चा देवायाग्नये ।
यं मित्रं न प्रशस्तिभिर्मर्तासो दधिरे पुरः ॥१॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! अत्यंत दिव्य आणि प्रकाशमान अग्निदेवांसाठी, तुम्ही यज्ञात मोठ्या प्रमाणावर हविष्यान्नाची आहुती अर्पण करा आणि त्यांची मनापासून प्रार्थना करा. अग्निदेवांना सर्व सामान्य मनुष्य आपल्या सुंदर स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे मित्रांप्रमाणे पूजनीय स्थानी स्थापित करतात. ॥१॥

स हि द्युभिर्जनानां होता दक्षस्य बाह्वोः ।
वि हव्यमग्निरानुषग्भगो न वारमृण्वति ॥२॥

अग्निदेव खरोखरच आपल्या तेजाने यज्ञकर्त्या भक्तगणांचे मुख्य पुरोहित बनले आहेत. कुशल यज्ञकर्त्या भक्तगणांच्या दोन्ही हातांमध्ये राहून अग्निदेव हविष्यान्नाच्या आहुतीचे योग्य रीतीने वहन करतात. अग्निदेव ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या भगदेवांप्रमाणे भक्तगणांना इच्छित धन प्रदान करतात. ॥२ ॥

अस्य स्तोमे मघोनः सख्ये वृद्धशोचिषः ।
विश्वा यस्मिन्तुविष्वणि समर्ये शुष्ममादधुः ॥३॥

ऐश्वर्याचे स्वामी आणि प्रचंड दिव्य तेज असणाऱ्या अग्निदेवांशी सख्य जोडण्यासाठी सर्व यज्ञकर्ते भक्तगण एकत्र येतात. गर्जना करणाऱ्या, उत्तम प्रकृतीचे स्वामी असणाऱ्या अग्निदेवांना सर्व भक्तगण आपले बल आणि हविष्यान्नाची आहुती समर्पित करतात. ॥३ ॥

अधा ह्यग्न एषां सुवीर्यस्य मंहना ।

तमिद्यह्वं न रोदसी परि श्रवो बभूवतुः ॥४॥

हे अग्निदेवा ! आपल्या मोठेपणामुळे आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम शौर्य आणि सामर्थ्य प्राप्त व्हावे ही विनंती. आकाशलोकांप्रमाणे आणि पृथ्वीलोकांप्रमाणे अग्निदेवांची महान आणि पूजनीय कीर्ती सर्व दिशांना व्यापून राहिली आहे. ॥४॥

नू न एहि वार्यमग्ने गृणान आ भर ।

ये वयं ये च सूरयः स्वस्ति धामहे सचोतैधि पृत्सु नो वृधे ॥५ ॥

हे अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांद्वारे स्तुती केली जात असताना आपण आमच्याकडे शीघ्रतेने येऊन स्वीकारण्यायोग्य असे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांबरोबर उपस्थित राहून आमच्या जीवनरूपी संघर्षात आमचे पाठीराखे व्हावे ही विनंती. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१६

ऋषि- पूरु आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** त्रिष्टुप् ५ पंक्ति

बृहद्वयो हि भानवेऽर्चा देवायाग्नये ।
यं मित्रं न प्रशस्तिभिर्मर्तासो दधिरे पुरः ॥१॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! अत्यंत दिव्य आणि प्रकाशमान अग्निदेवांसाठी, तुम्ही यज्ञात मोठ्या प्रमाणावर हविष्यान्नाची आहुती अर्पण करा आणि त्यांची मनापासून प्रार्थना करा. अग्निदेवांना सर्व सामान्य मनुष्य आपल्या सुंदर स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे मित्रांप्रमाणे पूजनीय स्थानी स्थापित करतात. ॥१॥

स हि द्युभिर्जनानां होता दक्षस्य बाह्वोः ।
वि हव्यमग्निरानुषग्भगो न वारमृण्वति ॥२॥

अग्निदेव खरोखरच आपल्या तेजाने यज्ञकर्त्या भक्तगणांचे मुख्य पुरोहित बनले आहेत. कुशल यज्ञकर्त्या भक्तगणांच्या दोन्ही हातांमध्ये राहून अग्निदेव हविष्यान्नाच्या आहुतीचे योग्य रीतीने वहन करतात. अग्निदेव ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या भगदेवांप्रमाणे भक्तगणांना इच्छित धन प्रदान करतात. ॥२ ॥

अस्य स्तोमे मघोनः सख्ये वृद्धशोचिषः ।
विश्वा यस्मिन्तुविष्वणि समर्ये शुष्ममादधुः ॥३॥

ऐश्वर्याचे स्वामी आणि प्रचंड दिव्य तेज असणाऱ्या अग्निदेवांशी सख्य जोडण्यासाठी सर्व यज्ञकर्ते भक्तगण एकत्र येतात. गर्जना करणाऱ्या, उत्तम प्रकृतीचे स्वामी असणाऱ्या अग्निदेवांना सर्व भक्तगण आपले बल आणि हविष्यान्नाची आहुती समर्पित करतात. ॥३ ॥

अधा ह्यग्न एषां सुवीर्यस्य मंहना ।

तमिद्यह्वं न रोदसी परि श्रवो बभूवतुः ॥४॥

हे अग्निदेवा ! आपल्या मोठेपणामुळे आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम शौर्य आणि सामर्थ्य प्राप्त व्हावे ही विनंती. आकाशलोकांप्रमाणे आणि पृथ्वीलोकांप्रमाणे अग्निदेवांची महान आणि पूजनीय कीर्ती सर्व दिशांना व्यापून राहिली आहे. ॥४॥

नू न एहि वार्यमग्ने गृणान आ भर ।

ये वयं ये च सूरयः स्वस्ति धामहे सचोतैधि पृत्सु नो वृधे ॥५ ॥

हे अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांद्वारे स्तुती केली जात असताना आपण आमच्याकडे शीघ्रतेने येऊन स्वीकारण्यायोग्य असे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांबरोबर उपस्थित राहून आमच्या जीवनरूपी संघर्षात आमचे पाठीराखे व्हावे ही विनंती. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१८

ऋषि- मृक्तवाह द्वित आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ५ पंक्ति

प्रातरग्निः पुरुप्रियो विशः स्तवेतातिथिः ।

विश्वानि यो अमर्त्यो हव्या मर्तेषु रण्यति ॥१॥

पहाटेच्या वेळी, सर्वांना अत्यंत प्रिय असणाऱ्या आणि घरातील अतिथीप्रमाणे आदरणीय असलेल्या अग्निदेवांची यज्ञकर्त्या भक्तगणांनी स्तुती करावी. अविनाशी अग्निदेव आम्हा मर्त्य भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीचा आनंदाने स्वीकार करतात. ॥१॥

द्विताय मृक्तवाहसे स्वस्य दक्षस्य मंहना ।

इन्दुं स धत्त आनुषक्स्तोता चित्ते अमर्त्य ॥२॥

हे अग्निदेवा! अत्यंत शुद्ध आणि पवित्र अशा यज्ञातील हव्याचे वहन करणाऱ्या, द्वित आत्रेय नावाच्या ऋषींना आपण बल आणि सामर्थ्य प्रदान करता. आपली सतत स्तुती करणारे द्वित आत्रेय दिव्य आनंद आणि दिव्य शक्ती (सोम) आपल्याला समर्पित करतात. ॥२ ॥

तं वो दीर्घायुशोचिषं गिरा हुवे मघोनाम् ।

अरिष्टो येषां रथो व्यश्वदावन्नीयते ॥३॥

हे अश्व आणि ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या तेजस्वी अग्निदेवा ! यज्ञ करणाऱ्या उदार धनिकांच्या आणि भक्तांच्या कल्याणासाठी आम्ही स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपले आवाहन करतो. आपल्या कृपेमुळे या भक्तांचे रथ (प्रगतीचे मार्ग) कोणत्याही संकटाशिवाय सुरक्षितपणे आणि वेगाने पुढे जात राहोत.॥३॥

चित्रा वा येषु दीधितिरासन्नुक्था पान्ति ये ।

स्तीर्णं बर्हिः स्वर्णरे श्रवांसि दधिरे परि ॥४॥

ज्या श्रेष्ठ भक्तगणांमध्ये निश्चितपणे अद्भुत बुद्धी असते आणि जे आपल्या वाणी द्वारे स्तुतियुक्त स्तोत्रांचे निरंतर पठण करतात त्यांच्यासाठी यज्ञाच्या पवित्र ठिकाणी आसने पसरवली जातात आणि ते सर्व बाजूंनी दैदीप्यमान कीर्ती व यश मिळवतात. ॥४॥

ये मे पञ्चाशतं ददुरश्वानां सधस्तुति ।

द्युमदग्ने महि श्रवो बृहत्कृधि मघोनां नृवदमृत नृणाम् ॥५॥

हे अविनाशी अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होऊन ज्या ऐश्वर्यवान व उदार पुरुषांनी आम्हाला पन्नास घोडे दान म्हणून दिले आहेत, त्या धनवान व्यक्तींच्या निवासस्थानाला उत्तम सेवकांनी सर्व बाजूंनी समृद्ध आणि विपुल अन्न आणि मोठी कीर्ती प्राप्त करून द्यावी ही विनंती॥५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-१९

ऋषि- वव्रि आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** १,२ गायत्री३,४ अनुष्टुप् ५ विराट् रूपा

अभ्यवस्थाः प्र जायन्ते प्र वव्रेर्ववृिश्चिकेत । उपस्थे मातुर्वि चष्टे ॥१॥

जेव्हा अग्निदेव वेगवेगळ्या रूपांमध्ये (वव्रिः)प्रकट होतात तेव्हा अग्निदेव आपले पूर्वीचे रूप सोडून देतात आणि नवीन धारण करतात. अग्निदेव आपल्या मातांच्या (अरणीच्या) कुशीत राहून सर्व काही स्पष्टपणे पाहतात॥१॥

जुहुरे वि चितयन्तोऽनिमिषं नृम्णं पान्ति । आ दृळ्हां पुरं विविशुः ॥२॥

हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपले सामर्थ्य जाणून, यज्ञामध्ये आहुती अर्पण करत, अहोरात्र जागृत राहून आवाहन करतात, ते शत्रूंच्या अभेद्य नगरीत प्रवेश करतात. ॥२॥

आ श्वैत्रेयस्य जन्तवो द्युमद्वर्धन्त कृष्टयः ।

निष्कग्रीवो बृहदुक्थ एना मध्वा न वाजयुः ॥३॥

श्वेत्रेचा पराक्रमी पुत्र श्वैत्रेय राजाची दीप्तिमान आणि प्रगतीशील प्रजा अग्निदेवांच्या कृपेने समृद्ध होत आहे. गळ्यात सुवर्ण अलंकार परिधान केलेला आणि महान स्तुती करणारा, युद्धातील विजयाची आकांक्षा बाळगणारा श्वैत्रेय राजा अग्निदेवांची कृपा प्राप्त करतो ॥३ ॥.

प्रियं दुग्धं न काम्यमजामि जाम्योः सचा ।

घर्मो न वाजजठरोऽदब्धः शश्वतो दभः ॥४ ॥

जे आपल्या जठरात दुधात मिसळलेले अन्न ठेवतात , ज्यांना शत्रूंकडून इजा होत नाही आणि जे नेहमी शत्रूंना हानी पोहोचवतात, अशा हे अग्निदेवा ! आपण दोन सख्ख्या बहिणी प्रमाणे पृथ्वी आणि आकाशाला एकत्र ठेवतांना सहाय्य करता. आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे मधुर आणि दुधासारखे प्रिय स्तोत्रे ऐकावीत ही विनंती. ॥४॥

क्रीळन्नो रश्म आ भुवः सं भस्मना वायुना वेविदानः ।

ता अस्य सन्धृषजो न तिग्माः सुसंशिता वक्ष्यो वक्षणेस्थाः ॥५ ॥

हे प्रकाशकिरणांनी युक्त असणाऱ्या तेजस्वी अग्निदेवा ! वायूच्या साहाय्याने प्रदीप्त होऊन आणि राखेमध्ये क्रीडा करत आपण आमच्या यज्ञात उपस्थित व्हावे ही विनंती . यज्ञवेदीवर असलेल्या अग्निदेवांच्या तीक्ष्ण आणि उत्तम प्रकारे चेतवलेल्या ज्वाळा , शत्रूंना धूळ चारणाऱ्या शस्त्रांप्रमाणे अत्यंत वेगवान व सामर्थ्यशाली आहेत ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२०

ऋषि- प्रयस्वन्त आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप्

यमग्ने वाजसातम त्वं चिन्मन्यसे रयिम् ।

तं नो गीर्भिः श्रवाय्यं देवत्रा पनया युजम् ॥१॥

सर्व अन्नदात्यामध्ये श्रेष्ठ हे अग्निदेवा ! आम्ही अर्पण केलेल्या ज्या वस्तु आपण संपत्ती म्हणून मानता, त्या कीर्ती मिळवून देणाऱ्या संपत्तीची आम्ही आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे देवांच्या समोर प्रशंसा करतो. ती संपत्ती आम्हाला लाभू दे ही विनंती ॥१॥

ये अग्ने नेरयन्ति ते वृद्धा उग्रस्य शवसः ।

अप द्वेषो अप ह्वरोऽन्यव्रतस्य सश्चिरे ॥२॥

हे अग्नीदेवा! जे आपल्या कृपेने, उग्र आणि प्रचंड शक्तीने समृद्ध झाले आहेत आणि जे आम्हा भक्तगणांना प्रगतीच्या पथावर पुढे नेतात, ते आमच्यातील द्वेष आणि कुटिलता दूर करोत. तसेच जे सत्य आणि निसर्गाच्या नियमांच्या विरुद्ध (अन्यव्रत) वागतात, त्यांना ते नष्ट करोत ही विनंती ॥२॥

होतारं त्वा वृणीमहेऽग्ने दक्षस्य साधनम् ।

यज्ञेषु पूर्व्यं गिरा प्रयस्वन्तो हवामहे ॥३॥

हे अग्निदेवा ! यज्ञकार्यात सर्वात प्रमुख आणि कार्यास गती देणारे प्रमुख यज्ञकर्ते म्हणून आम्ही भक्तगण आपली निवड करतो. आम्ही हातात हविष्यान्नाची आहुती घेऊन, स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपले यज्ञात आवाहन करत आहोत. ॥३॥

इत्था यथा त ऊतये सहसावन्दिवेदिवे ।

राय ऋताय सुक्रतो गोभिः ष्याम सधमादो वीरैः स्याम सधमादः ॥४॥

हे श्रेष्ठ कर्म करणाऱ्या अग्निदेवा ! आपल्या संरक्षणाखाली आम्हा भक्तगणांना दररोज आनंद मिळो ही विनंती. हे अग्निदेवा ! आपण आमच्यावर अशी कृपा करावी की आम्हाला धनप्राप्ती होऊन यज्ञ करू शकू आणि आम्ही गोधन आणि पराक्रमी पुत्र-पौत्र यांच्यामुळे आनंदी राहू ॥४ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२१

ऋषि- - सस आत्रेय आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ४ पंक्ति

मनुष्वत्त्वा नि धीमहि मनुष्वत्समिधीमहि ।

अग्ने मनुष्वदङ्गिरो देवान्देवयते यज॥१॥

हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे मनूने आपल्याला स्थापित आणि प्रदीप्त केले होते, त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला यज्ञवेदीवर स्थापित करून प्रदीप्त करत आहोत. हे आङ्गिरस अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांसाठी मनूप्रमाणेच श्रद्धापूर्वक यज्ञ करावा ही विनंती ॥१॥.

त्वं हि मानुषे जनेऽग्ने सुप्रीत इध्यसे ।

स्रुचस्त्वा यन्त्यानुषक्सुजात सर्पिरासुते॥२॥

हे उत्तम प्रकारे प्रसन्न होऊन प्रदीप्त होणाऱ्या अग्निदेवा ! आपण भक्तगणांच्या (मानुषे मनुष्यांच्या) मध्ये अत्यंत संतुष्ट होऊन प्रदीप्त होता. यज्ञामध्ये घृताने भरलेल्या स्रुवा मधून अर्पण केलेली आहुती आपल्याला प्राप्त होते. ॥२ ॥

त्वां विश्वे सजोषसो देवासो दूतमक्रत ।

सपर्यन्तस्त्वा कवे यज्ञेषु देवमीळते॥३॥

सर्व काळांचे ज्ञान असलेल्या हे अग्निदेवा ! सर्व देवांनी एकमताने आपल्याला संदेश वाहक बनवले आहे म्हणूनच यज्ञकर्ते भक्तगण यज्ञकार्य करताना दिव्य गुणांनी युक्त असलेल्या आपली सेवा करतात. ॥३॥

देवं वो देवयज्ययाग्निमीळीत मर्त्यः ।

समिद्धः शुक्र दीदिह्यृतस्य योनिमासदः ससस्य योनिमासदः॥४॥

मर्त्य माणूस कल्याणसाठी, देवांच्या पूजनासाठी दिव्य व प्रकाशमान अशा अग्निदेवांची स्तुती करतो. हे दैदीप्यमान आणि शुद्ध अग्निदेवा आपण उत्तमरीत्या प्रदीप्त होऊन आमच्यासाठी अन्नाची समृद्धी देणाऱ्या यज्ञाच्या पवित्र वेदीवर आपल्या दिव्य प्रकाशाने प्रकट व्हावे ही विनंती. ॥४ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२२

ऋषि- - विश्वसामा आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ४ पंक्ति

(विश्वसामा 'विश्व' म्हणजे सर्व किंवा संपूर्ण, आणि 'सामन्' म्हणजे सामवेद गायली जाणारी वैदिक सूक्ते)

प्र विश्वसामन्नत्रिवदर्चा पावकशोचिषे ।

यो अध्वरेष्वीड्यो होता मन्द्रतमो विशि॥१॥

हे सर्व सामवेदाचे ज्ञान असणाऱ्या विश्वसामा ऋषि ! अत्री ऋषींप्रमाणेच तुम्ही सुद्धा त्या पवित्र करणाऱ्या दिव्य प्रकाशमय अग्नदेवांची स्तुती करा, जे यज्ञकार्यांमध्ये स्तुतीस पात्र आहेत, ते देवांना आवाहन करणारे मुख्य यज्ञकर्ते आणि जे संपूर्ण मानवी प्रजेमध्ये अत्यंत आनंद निर्माण करणारे आहेत. ॥१॥

न्यग्निं जातवेदसं दधाता देवमृत्विजम् ।

प्र यज्ञ एत्वानुषगद्या देवव्यचस्तमः॥२॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही सर्व सृष्टीचे ज्ञान असणाऱ्या (जातवेद), दिव्य गुणसंपन्न, ऋतूंना अनुसार यज्ञसंपन्न करणाऱ्या अग्निदेवांची यज्ञामध्ये प्रतिष्ठापना करावी. देवांना अत्यंत प्रिय असलेला आणि त्यांना तृप्त करणारा हा तुमचा यज्ञ यशस्वी होवो. ॥२ ॥

चिकित्विन्मनसं त्वा देवं मर्तास ऊतये ।

वरेण्यस्य तेऽवस इयानासो अमन्महि ॥३ ॥

हे प्रकाशमय आणि ज्ञानस्वरूपी अग्निदेवा! आम्ही मर्त्य यज्ञकर्ते भक्तगण रक्षणासाठी आपल्याकडे आलो आहोत. आम्ही श्रेष्ठ अशा आपल्या आश्रयाची कामना करत, आपले मनःपूर्वक चिंतन करतो. ॥३ ॥

अग्ने चिकिद्ध्यस्य न इदं वचः सहस्य ।

तं त्वा सुशिप्र दम्पते स्तोमैर्वर्धन्त्यत्रयो गीर्भिः शुम्भन्त्यत्रयः॥४॥

हे शक्तीने श्रेष्ठ असणाऱ्या अग्निदेवा ! आमच्याद्वारे केल्या जाणाऱ्या स्तुतीचा आपण स्वीकार करावा ही विनंती. हे सुंदर हनुवटी आणि नासिका असलेल्या (सुशिप्र), गृहपती अग्निदेवा! अत्रिऋषींचे वंशज स्तुतीने आपल्याला गौरवित आणि अलंकृत करत आहेत. ॥४ ॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.
प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे पंधरावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६४ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६३ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५),

अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी - मूळ वाल्मिकी रामायण(३२)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१९ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१५)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’ई’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)





आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा